**बॉम्बे चष्माघर**
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००
संस्थापक - लोकमित्र भाई मदाने
WWW.APLAMAHARASHTRA.IN
POST REGD.No./DHL/53/24-26
संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२४४ ■ रविवार ७ जुन २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## नीट परीक्षा प्रकरणी शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा जंतर-मंतरवर कॉकरोच जनता पार्टीने केली मागणी






**नवी दिल्ली, दि.६- नीट पेपर लीक आणि देशातील नामांकित परीक्षांमध्ये झालेल्या घोटाळ्यांविरोधात आज देशाच्या राजधानीत विद्यार्थ्यांचा संताप अनावर झाला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून अल्पावधीत तरुणांना एकत्र आणणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीचे जंतर-मंतर मैदानावर पहिले अधिकृत आंदोलन सुरू झाले आहे. या आंदोलनात देशभरातून आलेले हजारो तरुण आणि विद्यार्थी सहभागी झाले असून, संपूर्ण परिसर केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या घोषणांनी दणाणून गेला आहे.**

या आंदोलनाचे नेतृत्व करण्यासाठी शनिवारी सकाळी ७:४५ वाजता अमेरिकेतून दिल्लीत दाखल झालेले पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके तब्बल दीड तास विमानतळाच्या आत अडकले होते. अखेर सर्व कायदेशीर सोपस्कर पूर्ण करून जेव्हा ते विमानतळाबाहेर आले, तेव्हा त्यांनी सर्वात आधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तक हातात उंचावून दाखवले. हातात देशाचा तिरंगा आणि आंबेडकरांचे पुस्तक घेऊन ते थेट जंतर-मंतर येथील आंदोलनस्थळाकडे रवाना झाले.

विमानतळावरून मैदानाकडे जात असताना अभिजीत दिपके यांनी आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाऊंटवरून लाईव्ह करत समर्थकांशी संवाद साधला. आपल्या पक्षाचे हे पहिलेच मोठे आणि जाहीर आंदोलन असल्याने कोणाकडूनही चूक होता कामा नये, असे आवाहन त्यांनी केले. सर्वांनी शांततेच्या मार्गानेच आंदोलन करावे, बंदोबस्तावर तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा आदर करावा आणि त्यांच्या सेवेसाठी त्यांना फुले भेट द्यावीत, असे त्यांनी लाईव्ह दरम्यान सांगितले.

पक्षाने आंदोलकांसाठी जारी केलेल्या आठ कलमी नियमावलीचे पालन करत हजारो तरुण आज हातात तिरंगा, पुस्तक, फुले घेऊन आणि सनस्क्रीन लावून आंदोलनात सहभागी झाले आहेत. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पाच विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, या मागणीवर आंदोलक ठाम आहेत.

सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टी स्थापन करून सरकारला थेट आव्हान देणारे अभिजीत दिपके (पान ८ वर)

## पंजाबमध्ये अपघात नऊ ठार, पंधरा जखमी

फिरोजपूर, दि.६- पंजाबमधील फाजिल्का-फिरोजपूर रस्त्यावर शनिवारी ६ जून सकाळी पिकअप आणि ट्रकची भीषण टक्कर झाली. या अपघातात नऊ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून पंधरा जण जखमी झाले आहेत. जखमींना खाजगी आणि सरकारी रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे. तर गंभीर जखमींना फरिदकोटला हलवण्यात आलं आहे. या अपघातामुळं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, जलालाबाद येथील एका कुटुंबातील सदस्य त्यांच्या वृद्ध महिलेच्या अस्थींचं विसर्जन करण्यासाठी डेरा बियासला जात होते. पिकअपमध्ये महिला, पुरुष आणि मुलांसह जवळपास पंचवीस जण प्रवास करत होते. या अपघातात पाच महिला, तीन पुरुष आणि एका मुलाचा मृत्यू झाला, तर पंधरा जण जखमी झाले. अपघाताची (पान ८ वर)

## पिकविमा नुकसान भरपाई तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांना दिलासा द्या-राष्ट्रवादी कॉंग्रेसची मागणी

**नंदुरबार, दि.६- नंदुरबार राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुका तर्फे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांना तालुक्यामध्ये पिक विमा नुकसान भरपाई तात्काळ मंजूर करून शेतकऱ्यांना न्याय मिळावा या मागणीचे निवेदन तालुक्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने देण्यात आले.**



नंदुरबार तालुकात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट व इतर नैसर्गिक आपतींमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पीकविमा योजनेअंतर्गत अनेक शेतकऱ्यांनी अर्ज व प्रीमियम भरलेला असूनही अद्याप नुकसानभरपाई मिळालेली नाही. काही प्रकरणांमध्ये तांत्रिक कारणे दाखवून दावे प्रलंबित अथवा नामंजूर करण्यात आले आहेत. अशा समस्या राज्यातील विविध भागांतही नोंदवल्या गेल्या आहेत. तरी आपण संबंधित प्रशासन व विमा कंपनीला योग्य सूचना देऊनः सर्व प्रलंबित पीकविमा दावे तात्काळ निकाली काढावेत. पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई लवकरात लवकर वितरित करावी. तांत्रिक कारणांमुळे नाकारलेले दावे पुन्हा तपासावेत. पंचनामे व सर्वेक्षण प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी. शेतकऱ्यांना विमा दाव्यांची माहिती व मदत उपलब्ध करून द्यावी. अशी विनंती आहे. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून योग्य ती कार्यवाही करावी. सदर मागणीचे निवेदन नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार हसनजी मुश्रीफ यांना देण्यात आले. यावेळी नंदुरबार तालुक्याचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष डॉ योगेश पाटील , जिल्हा सरचिटणीस मधुकर पाटील, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष संजय खंदारे उपस्थित होते.

## छ.शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन मराठा समाजातर्फे उत्साहात साजरा



**धुळे, दि.६- छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन दि.६ जून रोजी सकल मराठा समाज धुळे तर्फे उत्साहात साजरा करण्यात आला. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सकाळी दहा वाजता धुळे शहरातील मनोहर चित्र मंदिर जवळील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला सकल मराठा समाज धुळे तर्फे अभिषेक करण्यात आले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पमाळ अर्पण करून सामुहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय जिजाऊ जय शिवराय आदी घोषणांनी परिसरत दणाणून गेला होता.**

यानंतर सुधाकर दादा बेंद्रे यांनी आपले मत व्यक्त केले की, आपण सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांवर चालणे खूप गरजेचे आहे. तसेच समाजाने संघटीत राहून एकत्रित होणे ही काळाची गरज आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम केले. त्याचप्रमाणे आपण देखील इतरांना मदत करीत रहायले हवे, समाजातील गोरगरीब, वंचित, दुर्बल घटकांना न्याय देण्याचा प्रयतक करायला हवे असे मत यावेळी सुधाकर दादा बेंद्रे यांनी व्यक्त केले.

यावेळेस सकल मराठा समाजाचे (पान ८ वर)

## जापीत जमिनीच्या वादातून मारहाण

धुळे, दि६- शेतजमिनीच्या वादातून एकाला लोखंडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना जापी ता. धुळे येथे घडली. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात परस्परविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

जापी येथील महादेव मंदिराजवळ, शेत शिवारात मंगळवारी दि.२ जून रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास दोन कुटुंबीयांमध्ये शेत जमिनीवरून वाद झाला. वादाचे पर्यावसान दोन गटातील हाणामारीत झाले, पाईप, लाकडी दांडका कुऱ्हाडीने मारहाण करण्यात आली. याप्रकरणी अंकुश जगन्नाथ कोळी (वय ४९) यांनी दिलेल्या (पान ८ वर)

## हुडको कॉलनीच्या खुल्या जागेची मागणी जागा कॉलनीकडेच राहू देण्याचा निर्णय

**नंदुरबार, दि. ४- नंदुरबार येथील नगरपालिकेत हुडको कॉलनीतील खुली जागा कॉलनी कडेच राहू द्यावी या संदर्भात चर्चेतून निर्णय घेण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी राहुल वाघ नगरसेवक किरण रघुवंशी राऊ मोरे व कॉलनीतील रहिवासी उपस्थित होते.**




नंदुरबार नगरपरिषद येथे हुडको कॉलनीतील रहिवाशी आणि आई वडील व जेष्ठ नागरिक कल्याण संस्थेचे सदस्य यांची बैठक दि.३ जून रोजी घेण्यात आली. या बैठकीत हुडको कॉलॉनीतील रहिवाशीनी एक मताने सांगितले की हुडको कॉलनीतील खुली जागा ही नागरपरिषदे कडेच राहू द्यावी व तिची दुरुस्ती नगरपालिकेने करून द्यावी.या गोष्टीचा अनुषंगाने मुख्याधिकारी राहुल वाघ यांनी सांगितले की सदर जागेवर आई वडील व जेष्ठ नागरिक संस्थेचा कोणताही हक्क नाही आणि ही संस्था या जागेत कोणताही हस्तक्षेप करू नये. सदर जागा ही नगरपालिकेचीच राहील.

या वेळी गणेश गावित, नगरसेवक किरण रघुवंशी, राऊ मोरे, कुणाल वसावे, भूषण नेरे, जितेंद्र मराठे, (पान ८ वर)

## पावसाची चाहूल पण उकाड्याने त्रासात वाढ

शिरपूर दि.६ (का.प्र.) : जून महिन्याच्या प्रारंभी पावसाची चाहूल लागली असली तरी वातावरणातील वाढलेल्या आर्द्रतेमुळे उकाड्याने नागरिकांना त्राहि भगवान करुन सोडले आहे. सकाळपासूनच हवेत गारव्याऐवजी चिकटपणा जाणवत असून दुपारनंतर तर घामाच्या धारा लागल्याने नागरिक हैराण झाले आहेत. घराबाहेर पडणे कठीण झाले असून पंखे आणि कुलर सुरू असूनही अपेक्षित दिलासा मिळत नसल्याचे चित्र आहे.

हवामानातील बदलामुळे गेल्या काही दिवसांत वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण वाढले आहे. आकाशात ढगांची (पान ८ वर)

## हस्ती स्कूलमध्ये सरकार साहेब रावल यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**दोंडाईचा, दि.६- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार दोंडाईचा येथे ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त हस्ती परिसरात हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.**

पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून केवळ वृक्षारोपण करून न थांबता त्याचे संगोपन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हाच संदेश देत वृक्षारोपण कार्यक्रम (पान २ वर)

## आश्रमशाळेतील विद्यार्थी डॉ.संदीप पावरा झाला अधिकारी; आ.पटेलांनी केला सत्कार

**शिरपूर, दि.६- आर. सी.पटेल आश्रमशाळा व शिरपूर ६०उपक्रमाचा विद्यार्थी डॉ. संदीप पावरा वैद्यकीय अधिकारी वर्ग एक पदी नियुक्त झाला असून माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी गुणगौरव केला.**

आदिवासी, ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावरील संधी उपलब्ध करून देण्याचे ध्येय बाळगणाऱ्या शिरपूर ६० उपक्रमाने आणखी एक ऐतिहासिक यश आपल्या नावावर नोंदवले आहे. या उपक्रमातील पहिले विद्यार्थी डॉ. संदीप रायसिंग पावरा यांनी एम.बीबीएस शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून जननायक वीर बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार



येथे वैद्यकीय अधिकारी वर्ग एक पदी नियुक्ती मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण शिरपूर तालुक्यासह आदिवासी समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जनक विला बंगला येथे आमदार अमरीशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, संस्था उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांच्या हस्ते डॉ. संदीप पावरा यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिरपूर तालुक्यातील विविध गांवातील सरपंच, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. (पान २ वर)

## वरखेडीतील तरुणास संशयावरून मारहाण

धुळे, दि.६- गावातील एका तरुणीस पळून जाण्यासाठी मदत केल्याच्या संशयावरून तरुणाला मारहाण केल्याची घटना घडली. सहा जणांविरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

वरखेडी गावातील ई-सेवा केंद्राजवळ शुक्रवारी दि.५ जून रोजी सकाळी आठच्या सुमारास पाच सहा जणांनी विशाल विश्वासराव पाटील आणि दिपक प्रमोद पाटील दोघे रा. भरतनगर, देवपूर, धुळे यांच्याशी वाद घातला. मुलगी पळवून नेण्यास मदत केल्याचा संशयावरून दोघांना पाईपने मारहाण केली. महाराणी दोघांना दुखापत झाली. याप्रकरणी विशाल पाटील (पान २ वर)

## जनगणनेत धुळे महापालिका प्रथम अधिकारी डांगे यांच्याकडून कौतुक

**धुळे, दि.६- जनगणना २०२७ धुळे महानगरपालिकेची ऐतिहासिक कामगिरी केली आहे. पहिल्या टप्प्याचं काम शंभर टक्के पूर्ण करत महाराष्ट्रात पहिला क्रमांक पटकावला आहे. जनगणनेचे काम पूर्ण करण्यासाठी दि.१४ जूनची मुदत असताना ५ जूनलाच काम फत्ते केल्याने राज्याच्या प्रमुख जनगणना अधिकारी श्रीमती निरुपमा डांगे यांच्याकडून धुळे मनपा टीमचे कौतुक करण्यात आले आहे.**




देशात आगामी काळात होणाऱ्या जनगणना २०२७ च्या मोहिमेत धुळे महानगरपालिकेने संपूर्ण महाराष्ट्रात बाजी मारली आहे. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यातील शंभर टक्के काम अत्यंत अचूकतेने आणि वेळेपूर्वी पूर्ण करून धुळे मनपाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. जनगणनेचा पहिला (पान २ वर)

## सरपंच ठाकरेंच्या हस्ते उभारली स्वराज्य गुढी

दोंडाईचा, दि.६- राज्य शासनाच्या वतीने ६ जून हा शिवराज्याभिषेक दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करून प्रत्येक ग्रामपंचायतीत स्वराज्याची गुढी उभारण्याचे निर्देश होते त्यानुसार कर्ले ग्रामपंचायतीत सरपंच सौ सिमा दिनेश ठाकरे यांच्या हस्ते स्वराज्याची गुढी उभारून हा दिवस साजरा करण्यात आला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजन देखील यावेळी पार पडले

यावेळी सरपंच सीमा दिनेश ठाकरे यांच्या समवेत उपसरपंच पंडित वाघ, माजी सरपंच दगाजी देवरे, (पान २ वर)

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,39,000 रु.+3% GST
सोने- 24 K -1,51,800 रु.+3% GST
चांदी- 2,50,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## आ.चंद्रकांत रघुवंशींना कॅबिनेट मंत्रीपद द्या कार्यकर्त्यांचे खा.श्रीकांत शिंदेना साकडे

**शहादा,दि.०६ (का.प्र.)- शिवसेनेचे नंदुरबार जिल्हा संपर्क प्रमुख तथा आमदार चंद्रकांत रघुवंशी यांना आगामी महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेनेच्या कोट्यातून कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे, अशी आग्रही मागणी शिवसेना संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे करण्यात आली आहे. तळोदा येथील शिवसंवाद दौऱ्यादरम्यान शिवसेना शहादा तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्यासह शहादा परिसरातील नागरिकांनी खा. शिंदे यांना या मागणीचे निवेदन दिले.**



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,नंदुरबार जिल्हा दुर्गम आणि विकासाच्या मुख्य प्रवाहापासून काहीसा वंचित आहे. रोजगार आणि सिंचनाचे प्रश्न सोडवण्यासाठी जिल्ह्याला चंद्रकांत रघुवंशी यांच्यासारख्या अनुभवी नेतृत्वाची गरज आहे. तत्कालीन संयुक्त धुळे-नंदुरबार जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दुर्गम भागात विकासकामे पोहोचवली. तसेच नंदुरबार नगरपालिकेत विकासाचा नवा पॅटर्न निर्माण केला. साक्री आणि अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघांत (पान २ वर)

## एल.पी.जी. सिलिंडर घरपोच द्या; मागणी

खापर, दि.५(प्रतिनिधी)- खापर शहर व परिसरातील नागरिकांना बुकिंग करूनही एलपीजी सिलिंडर घरपोच मिळत नसल्याने भारतीय जनता पक्षच्यावतीने अक्कलकुवा तहसीलदार यांच्याकडे निवेदन देण्यात आले.

गेल्या अनेक दिवसांपासून घरगुती स्वयंपाकासाठी लागणारे गॅस सिलिंडरचा पुरवठा विस्कळीत आहे. नागरिकांना नोंदणी करूनही घरपोच गॅस सिलिंडर मिळत नसल्याने गावातील नागरिक कोराई येथे मध्यरात्री पासून रांगा लावून तासनतास बसून राहत दुसऱ्या दिवसापर्यंत गॅस सिलेंडर मिळण्याची (पान ४ वर)

## दोन मंदिरांतील चोरीचा गुन्हा उघड आरोपी गजाआड, मुद्देमाल हस्तगत

**नंदुरबार, दि.६(प्रतिनिधी)- नंदुरबार शहरातील रोकडेश्वर हनुमान मंदिर, कुंभार गल्ली तसेच श्री महालक्षेश्वर शिवालय मंदिर, देसाईपुरा येथे झालेल्या चोरीच्या गुन्ह्याचा नंदुरबार शहर पोलिसांनी अवघ्या चोवीस तासांत छडा लावत आरोपीस अटक केली असून चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त करण्यात यश मिळविले आहे.**

दि. ४ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्याने मंदिर परिसरातून पितळ धातूची घंटा, तांबे धातूची १६ किलो वजनाची नागदेवतेची मूर्ती तसेच बजाज कंपनीची प्लॅटिना मोटारसायकल असा एकूण ७१,४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी केला होता.

याप्रकरणी नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या २४ तासांत आरोपीचा शोध घेत त्याला अटक केली. तसेच चोरीस गेलेला मुद्देमालही जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, अपर पोलीस अधीक्षक आशित कांबळे तथा उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निलेश देसले व नंदुरबार शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक छगन चव्हाण, भनेश मराठे, जगदीश पाटील, नरेंद्र चौधरी, नरेंद्र पाडवी, राहुल राठोड, अमित भरवाड, रूपेश पगारे, ललित गवळी, विवेक ठाकरे, अनिल वसावे, विद्येश्वर बिरारी तसेच महिला पोलीस कॉन्स्टेबल निंबाबाई वाघमोडे यांनी सहभाग घेतला.

## शिवनेरी कॉ. वृक्षारोपण आ.अग्रवालांची उपस्थिती

धुळे, दि.६-जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून साक्री रोडवरील जय मल्हार नगरजवळील प्रभाग क्रमांक ९ मधील शिवनेरी कॉलनी परिसरातील महानगरपालिकेच्या मोकळ्या भूखंडावर भारतीय जनता पार्टी आणि युवा फाउंडेशनचे अध्यक्ष दिनेश पोद्दार यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.कार्यक्रमाचा शुभारंभ धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल (पान २ वर)






**सेंद्रिय जांभुळ**
संकेत नित्या फार्मचे
उत्कृष्ट सेंद्रिय जांभुळ
उपलब्ध
✻ संपर्क ✻
वेळ : सकाळी ११ ते रात्री ८ वाजेपर्यंत
दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग-धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## धनगरवाडीतील दारू कारखाना उध्वस्त

धुळे, दि.६ - धुळे तालुक्यातील धनगरवाडी शिवारात राज्य उत्पादन शुल्काच्या पथकाने छापा टाकून अवैधरित्या सुरू असलेले गावठी दारुचे अड्डे उध्वस्त केले. आठ लाख सोळा हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

राज्य उत्पादन शुल्क धुळे विभागाच्या अधीक्षक स्वाती काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने धनगरवाडी शिवार तलावकाठी छापा टाकला. अवैधरित्या सुरू असलेले गावठी दारूचे अड्डे उध्वस्त केले. विविध ठिकाणी कारवाई करीत एकूण ३३ गुन्हे दाखल केले. दारू तयार करण्यासाठी लागणारे १७ हजार ९८० लिटर रसायन,(पान २ वर)

## मानसिक तणावाखाली उबेर चालकाने सोनगीर वनक्षेत्रात स्वत:ला जाळून घेतले

**सोनगीर दि.६ (प्रतिनिधी) - सोनगीर गावाच्या उत्तरेकडील राखीव वनक्षेत्रात शनिवारी सकाळी एका इसमाचा अर्धवट जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मानसिक तणावाखाली असलेल्या या व्यक्तीने स्वतः वर डिझेल ओतून आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले आहे. सोनगीर पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवून मृतदेहाची ओळख पटवली असून, मृत व्यक्ती चाळीसगाव येथील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.**



शनिवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास सोनगीर गावाच्या उत्तरेकडे असलेल्या राखीव वनक्षेत्रातील गट नंबर ३८ मध्ये, (पान २ वर)

**पान १ वरुन**

## आश्रमशाळेतील विद्यार्थी डॉ.संदीप पावरा झाला अधिकारी

शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या दूरदृष्टीतून आणि समाजाभिमुख संकल्पनेतून साकारलेल्या शिरपूर उपक्रमाचा मुख्य उद्देश ग्रामीण व आदिवासी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. गेल्या पाच वर्षांपासून या उपक्रमाद्वारे एम.बी.बी.एस., आय.आय.टी., एन.आय.टी., एन.डी.ए. तसेच विविध राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांसाठी दर्जेदार प्रशिक्षण, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि निवासी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

खारीखान (ता. शिरपूर) येथील रहिवासी असलेल्या डॉ. संदीप पावरा यांचे शालेय शिक्षण आर. सी. पटेल आश्रमशाळा संकुलात पूर्ण झाले. त्यांच्या गुणवत्तेची दखल घेत शिरपूर उपक्रमांतर्गत त्यांना तांडे येथे दोन वर्षांसाठी नीट-यूजी व जेईई परीक्षांच्या तयारीसाठी मोफत निवासी प्रशिक्षण देण्यात आले. त्यानंतर त्यांना जननायक वीर बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. विशेष म्हणजे, प्रवेश शुल्कापासून ते निवास, शैक्षणिक साहित्य आणि इतर आवश्यक खर्चापर्यंतचा संपूर्ण आर्थिक भार शिरपूर एज्युकेशन सोसायटी मार्फत उचलण्यात आला. विशेष बाब म्हणजे, आमदार अमरिशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर ६० उपक्रमावर दरवर्षी पाच कोटी रुपयांहून अधिक निधी खर्च केला जात असून, आजपर्यंत पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी देशातील नामांकित शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण पूर्ण करून विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. हे विद्यार्थी केवळ स्वतःचे भविष्य घडवत नसून आदिवासी समाज आणि शिरपूर तालुक्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करत आहेत.

डॉ. संदीप पावरा यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, आमदार काशिराम दादा पावरा, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, सर्व ट्रस्टी, प्राचार्य एच. के. कोळी, प्राचार्य दिनेशकुमार राणा, प्राचार्य पी.पी.चव्हाण, प्राचार्य जे.व्ही.गिरासे, सर्व शिक्षक यांनी अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या. शिरपूर तालुक्यातील माझ्यासारख्या शेतीमजुरी करणाऱ्या आदिवासी कुटुंबातील विद्यार्थ्याला एम.बी.बी.एस. शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय अधिकारी होण्याची संधी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल व पटेल परिवार यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि आर्थिक सहकार्यामुळेच मिळाली. आर. सी. पटेल आश्रमशाळा संकुल व शिरपूर उपक्रमाने माझे आयुष्य घडविले आहे. भविष्यात एम.डी. (मेडिसिन) शिक्षण पूर्ण करण्याचा माझा मानस आहे. तसेच शिरपूर तालुक्यातील आदिवासी व ग्रामीण बांधवांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्याचा माझा दृढ संकल्प आहे. अशा प्रतिक्रिया डॉ.संदीप पावरा यांनी दिल्या.

## आ.चंद्रकांत रघुवंशींना कॅबिनेट मंत्रीपद द्या

शिवसेनेचे आमदार निवडून आणण्यात आ. रघुवंशी यांच्या रणनीतीचा मोठा वाटा आहे.विधान परिषदेत त्यांनी नेहमीच शोषित, वंचित आणि आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर प्रखर आवाज उठवला आहे.आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या आदिवासी समाजाला प्रगतीच्या पथावर नेण्यासाठी आणि नंदुरबार जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा कायापालट करण्यासाठी लोकनेते चंद्रकांत रघुवंशी यांचा मंत्रिमंडळात समावेश असणे ही समस्त जिल्हावासीयांची तीव्र भावना आहे असेही निवेदनात म्हटले आहे.

निवेदन स्वीकारताना खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासोबत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आनंद परांजपे, भाऊसाहेब चौधरी, माजी खासदार राजेंद्र गावित, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, आमदार आमश्या पाडवी, आमदार अविष्कार भुसे आदी मान्यवर उपस्थित होते. या निवेदनाची प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी मुख्य नेते व उप-मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडेही रवाना करण्यात आली आहे.या निवेदनावर शहादा तालुका प्रमुख मनलेश जायसवाल,शहर प्रमुख जितेंद्र जमदाडे, ज्येष्ठ नेते डॉ. राजेंद्र पेंढारकर, जयसिंग ठाकरे, लक्ष्मण पवार, एकनाथ ठाकरे, किरण खर्डे, छायाबाई भामरे, प्रियांका ठाकरे यांच्यासह शहादा परिसरातील अनेक कार्यकर्त्यांच्या व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## धनगरवाडीतील दारू कारखाना उध्वस्त

गावठी दारू ५१६ लिटर व इतर साहित्य असा एकूण ८ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हे दाखल झाले. निरीक्षक बी.व्ही. हिप्परगेकर, दुय्यम निरीक्षक डी. जी. गवळी, सहाय्यक उपनिरीक्षक अनिल निकुंभे, जवान मनोज धुळेकर, मयूर मोरे, दीपक अहिरराव, बाळकृष्ण सोनवणे, कल्पेश शेलार, निलेश मोरे यांनी कारवाई केली.

## वरखेडीतील तरुणास संशयावरून मारहाण

यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शीतल गुरुदास पाटील, गुरुदास आबा पाटील, प्रवीण आबा पाटील, मयूर प्रवीण पाटील, लकीचंद पाटील, मनीषा प्रवीण पाटील सर्व रा. फागणे ता. धुळे यांच्याविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

## शिवनेरी कॉ. वृक्षारोपण आ.अग्रवालांची उपस्थिती

यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आला. यावेळी उपमहापौर ज्योत्सना पाटील, स्थायी समिती सभापती लताबाई पोतदार, नगरसेविका जयश्री अहिरराव, नगरसेवक संजय जाधव, प्रदीप बैरागी, नगरसेविका पुनम शिरसाठ यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते दिनेश पोद्दार, निनाद पाटील, यशवंत येवलेकर, प्रफुल पाटील, नगरसेवक ललित माळी, दीपक कोळी, चेतन माळी, कैलास पाटील, सरदार पाटील, विश्वास बागुल, उदय पाटील, संदीप गवळी, वसंत भालेराव, मयूर बागुल, बापू पाटील, मनोहर सोलंकी, शरद पाटील, नाना मुळे, भैया गायकवाड, नाना सोजे, उत्तम पाटील, संजय रणदिवे, मुन्ना पाटोळे, मयूर पाटील, अक्षर जैन, भैया खैरनार, रोहन झाल्टे, विश्वास पाटील तसेच परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**पान १ वरुन**

## जनगणनेत धुळे महापालिका प्रथम

टप्पा अत्यंत महत्त्वाचा आणि आव्हानात्मक मानला जातो. महानगरपालिका हद्दीत ९०१ एच एल बी म्हणजेच गट हे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी धुळे मनपा आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा, उपयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी, जनगणना विभाग प्रमुख, चार चार्ज ऑफिसर, चार्ज लिपिक, सर्व तांत्रिक सहाय्यक,११७ पर्यवेक्षक आणि ६९० प्रगणक १६ मे पासून युद्धपातळीवर काम करत होते. आयुक्त श्री नितीन कापडणीस यांचा सातत्याचा पाठपुरावा, अचूक व सूक्ष्म नियोजन, दैनंदिन आढावा यामुळेच.दिलेल्या मुदतीच्या नऊ दिवस आधीच, म्हणजेच जून रोजी सायंकाळी धुळे शहराच्या जनगणनेच्या पहिल्या टप्प्याची म्हणजेच धुळे मनपा हद्दीतील घर यादींचे अंतिम नोंदणी पूर्ण झाली.

### आयुक्तांकडून टीमचे अभिनंदन

हा बहुमान धुळे महानगरपालिकेच्या प्रत्येक कर्मचाऱ्याच्या, पर्यवेक्षकाचा,प्रगणकाचा व अधिकाऱ्याच्या सांघिक कष्टाचे फळ आहे. दिलेल्या मुदतीपूर्वी आणि अचूकतेने काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आम्ही ठेवले होते, जे आमच्या टीमने पूर्ण करून दाखवले. राज्याच्या मुख्य जनगणना अधिकाऱ्यांनी केलेले कौतुक आमच्या संपूर्ण टीमचा उत्साह वाढवणारे आहे. धुळे मनपाने मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात व राज्याच्या प्रशासकीय वर्तुळात मनपा टीमचे जोरदार कौतुक होत आहे. इतर शहरांच्या तुलनेत धुळ्याने घेतलेली ही झेप अत्यंत कौतुकास्पद मानली जात आहे.

## मानसिक तणावाखाली उबेर चालकाने स्वत:ला जाळून घेतले

मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर जंगलात काही मेंढपाळ तरुण गेले होते. त्यांना तिथे एक अर्धवट जळालेला मृतदेह दिसून आला. त्यांनी तात्काळ या घटनेची माहिती वनक्षेत्रपालांना दिली. वनक्षेत्रपालांनी गांभीर्य ओळखून सोनगीर पोलिसांशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच सोनगीर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे, उपनिरीक्षक रवींद्र बागुल, उपनिरीक्षक किरण राजपूत, पो. कॉ. ईश्वर सोनवणे आणि रोहन वाघ यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह मोठ्या प्रमाणावर जळालेला असल्याने प्रथमदर्शनी त्याची ओळख पटवणे कठीण झाले होते.पोलिसांनी घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असता, मृतदेहापासून काही अंतरावर काही वस्तू जळालेल्या स्थितीत आढळल्या. या जळालेल्या वस्तूंची सूक्ष्म तपासणी केली असता, पोलिसांना एका वाहनाची माहिती (कागदपत्रे/क्रमांक) मिळून आली. त्यावरून सदर व्यक्ती उबेर या ऑनलाइन पच्या माध्यमातून भाड्याने वाहन चालवण्याचे काम करत असल्याचे निष्पन्न झाले.अधिक चौकशी अंती, मृत व्यक्तीचे नाव आनंदा प्रल्हाद सोनवणे (मूळ रा. चाळीसगाव, जि. जळगाव, हल्ली मुक्काम- उल्हासनगर, जि. ठाणे) असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तात्काळ मृत आनंदा सोनवणे यांच्या नातेवाईकांशी संपर्क साधला. त्यानंतर मृतदेहाचे घटनास्थळीच शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.तपासा दरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, आनंदा सोनवणे हे तीव्र मानसिक तणावाखाली होते. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी आपल्या नातेवाईकांना फोन करून मी आत्महत्या करत आहे,असे सांगितले होते. मृतदेहाजवळ जळालेल्या वस्तूंसोबतच पोलिसांना त्यांचा मोबाईल फोनही मिळून आला आहे. त्यांनी प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्यांमध्ये डिझेल आणून, ते अंगावर ओतून स्वतःला पेटवून घेतल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.उपविभागीय पोलीस अधिकारी संजय भांबळे यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली व सोनगीर पोलिसांना तपासाबाबत आवश्यक मार्गदर्शन केले. मृत आनंदा सोनवणे यांच्या ताब्यात प्रवासी वाहतूक करणारे वाहन (टॅक्सी) होते. मात्र, घटनास्थळी ते वाहन मिळून आलेले नाही. पोलीस आता या हरवलेल्या वाहनाचा शोध घेत आहेत.या प्रकरणी वन कर्मचारी जगदीश सुरेश पाटील यांनी सोनगीर पोलीस ठाण्यात दिलेल्या खबरीवरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत ताकाटे करीत आहेत.

## हस्ती स्कूलमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

प्रमुख अतिथी उद्योगपती सरकार साहेब रावल, स्वर विशेषज्ञ राजीव नाहर तसेच हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राचार्या रजिया दाऊदी, प्राचार्य जीवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, सोबतच समन्वयक मनोज ठाकूर, महेश डिगराळे, समन्वयिका समीना बोहरी, समन्वयक मंगलसिंग राजपूत उपस्थित होते. हस्ती स्कूल परिवार २४ वर्षांपासून निरंतर व अविरत वृक्षारोपण व संवर्धनाचे कार्य करत आहे, व ती परंपरा जोपासली आहे. आज या संस्थेचा परिसर हिरवा व निसर्गरम्य असण्यासाठी २४ वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फळ आहे असे चेअरमन कैलास जैन प्रास्ताविकपर मनोगतातून स्पष्ट केले. यावेळी उद्योगपती सरकारसाहेब रावल यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे अनन्य साधारण महत्व विषद केले. तसेच मुले हे शिक्षकांचे ऐकतात व त्यामुळे त्यांनी वृक्ष व पर्यावरण संवर्धन ही मोहिम हातात घ्यावी, असे मार्गदर्शन केले. तसेच प्लास्टिक मुळे होणारे पर्यावरणासोबत जनावरांना व मनुष्याला होणारे दुष्परिणाम विषद केले व प्लास्टिक वापर टाळावा असेही यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले. तसेच येत्या काळात कचरा व्यवस्थापन करिता योग्य ते उपक्रम राबवू असे सांगितले. यावेळी स्कूलच्या बाह्य परिसरात पर्यावरण साठी उपयुक्त व अनेक औषधी गुण असणाऱ्या कडूलिंबाचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उपस्थित शिक्षकांनीही वृक्षारोपण केले. हस्ती शाळा ही शैक्षणिक गुणवत्तेसोबतच संस्कार, पर्यावरणीय मूल्य, सामाजिक जाणीव ही मुलांमधे रुजवते, हे कौतूकास्पद आहे. हस्ती शाळेने वृक्ष संवर्धन सोबत प्लास्टिकच्या कमी वापर यासाठी प्रयत्न करावे. असे प्रतिपादन यावेळी प्रसिद्ध उद्योगपती सरकार साहेब रावल यांनी यावेळी केले.

## सरपंच ठाकरेंच्या हस्ते उभारली स्वराज्य गुढी

गोकुळ बेडसे, पोलिस पाटील प्रफुल पाटील, रमेश मोरे, नानाभाऊ ठाकरे, समाधान शेवाळे, शिवराम सोनवणे, लोटन चव्हाण, परमेश्वर पाटील, भूषण शिंदे, अनिल मोरे,शिवाजी चव्हाण, शिवाजी सोनवणे, महेंद्र मोरे, अंगणवाडी सेविका कोकिळा पाटील, सागर चव्हाण, शशिकांत चव्हाण, रतीलाल पगारे, अविनाश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते



## आ.पावरा, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेलांच्या हस्ते पोलीस दलात निवड झालेल्या तरुणांचा सत्कार

**शिरपूर, दि.६- आमदार काशिराम दादा पावरा, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांच्या हस्ते शिरपूर तालुका कोळी समाज कर्मचारी संघटना व शिरपूर तालुका कोळी समाजाच्या वतीने महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेल्या कोळी समाजातील गुणवंत तरुणांच्या सत्कार समारंभाचे आयोजन शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता आमोदे येथील लाकड्या हनुमान मंदिर परिसरात करण्यात आले. हा सोहळा समाजासाठी तसेच युवकांसाठी प्रेरणादायी व अभिमानास्पद ठरला.**

आमदार अमरिशभाई पटेल पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र चे मार्गदर्शन लाभल्याने पालक व सर्व गुणवंत उमेदवारांनी आभार व्यक्त केले आहेत.

समारंभाच्या प्रारंभी शिरपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष तथा युवा उद्योजक चिंतनभाई अमरीशभाई पटेल यांच्या हस्ते लाकड्या हनुमानाची महाआरती करण्यात आली. यानंतर महाराष्ट्र पोलीस दलात निवड झालेले विजय कोळी (होळनांथे), मनोहर कोळी (असली) व विशाल बागुल (गिधाडे) या गुणवंत तरुणांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी चिंतनभाई पटेल यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, शिरपूर तालुक्यातील तरुणांनी मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊन शासकीय सेवेत स्थान मिळवावे. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर समाज, गाव, तालुका तसेच आई-वडिलांचे नाव उज्ज्वल करण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले. यांनी निवड झालेल्या तरुणांना मार्गदर्शन करताना नोकरी करत असताना समाजाप्रती आदर, प्रामाणिकपणा, विश्वास आणि देशसेवेची भावना जपण्याचे आवाहन केले. तसेच आई-वडिलांची सेवा हीच खरी सेवा असल्याचे सांगून तरुणांना समाजासाठी आदर्श कार्य करण्याचा संदेश दिला.

या कार्यक्रमास आमदार काशिराम पावरा, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, जनकभाई पटेल, प्रशिक्षण केंद्र संचालक अन्साराम आगरकर, नगरसेवक रोहित रंधे, धुळे-नंदुरबार जिल्हा कर्मचारी संघटनेचे जिल्हा नेते किशोर बागुल, तालुका उपाध्यक्ष प्रमोद कुवर, सचिव दिनेश श्रीराव, सेवानिवृत्ती विभागाचे दिलीप शिरसाठ, संघटन समन्वयक रमेश देवरे, किशोर शिरसाठ, सल्लागार छोटुराम वाघ, बारकू पाटील, भिमराव ईशी, रमण कुवर, विनायक कोळी, संदीप कुवर, महेश ईशी, राजवर्धन पवार, हरीश पाटील, निलेश पाटील, राहुल ईशी, सुनील कोळी, पंडित केदार, महेंद्र पाटील, विजय चित्ते, समाधान कोळी, किरण कोळी, नागेश कोळी, सोनू कोळी, योगेश पाटील, विष्णू पाटील, सागर कोळी, मयूर मासरे, योगेश जाधव, राहुल महाजन, संदीप कोळी, विक्की कोळी, बापू कोळी, प्रकाश पाटील, किशोर कोळी, सुभाष पावरा, संतोष वंजारी, संजय कोळी, अमोल कोळी यांच्यासह पदाधिकारी, कर्मचारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोटन कोळी (असलीकर)

## शिक्षक हा आयुष्यभर समाजशिक्षक सोनवणेंचा आ.भदाणेंनी केला गौरव

**धुळे, दि.६- शिक्षक सेवेत असतांना विद्यार्थ्यांना घडविण्याचे व संस्कारीत करण्याचे पवित्र कार्य करीत असतात. शिक्षक सेवानिवृत्तीनंतरही समाजाच्या जडणघडणीत महत्वाची भूमिका बजावत असतात. ते खऱ्या अर्थाने समाज शिक्षकाचे काम बजावत असतात. मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे व शिक्षक रवींद्र सोनवणे दोन्ही शिक्षक विद्यार्थी प्रिय शिक्षक म्हणून नावरुपास आलेत, त्यांनी आता समाज शिक्षकाची महत्वपुर्ण भूमिका बजवावी, असे विचार आमदार राम भदाणे यांनी व्यक्त केलेत.**

बोरविहीर (ता.जि.धुळे) येथील शिक्षणमहर्षी पी. रा. पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक प्रकाश भगवान सोनवणे व शिक्षक रवींद्र साहेबराव सोनवणे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सेवानिवृत्ती गौरव सोहळा झाला. याप्रसंगी आमदार राम भदाणे बोलत होते. अनिल गवळी, मनोज सोनवणे, सखाराम पाटील तसेच शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची मोठी मांदियाळी होती.

आमदार भदाणे म्हणालेत, विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यात आणि ज्ञानदानाच्या पवित्र कार्यातून अवघ्या समाजाला वैचारिक दिशा देण्यात दोन्ही शिक्षकांचे योगदान अमूल्य आहे. सेवेतून निवृत्त होत असलेत, तरी त्यांच्याजवळील प्रदीर्घ अनुभवाची शिदोरी भावी पिढीसाठी सदैव मार्गदर्शक व प्रेरक ठरणार आहे. याप्रसंगी विविध मान्यवरांनी मनोगत व्यक्त केलेत.

## जाहीर नोटीस

तमाम सर्व लोकांना, बँका, वित्तीय संस्था यांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील वलवाडी, तु.जि.धुळे, धुळे पो.तु.ता.धुळे वलवाडी पैकी स.नं.१२५/४ पैकी प्लॉट नं.२०, पैकी दक्षिणेकडील भाग दुमजली आरसीसी निवास कामाकरीता असलेली मिळकत यांसी क्षेत्रफळ ८५ चौ. मिटर, आकार रूपये १३६.०० दुमजली बांधीव मिळकत सर्वसोयीयुक्त असून इलेक्ट्रीक कनेक्शनची स्वतंत्र व्यवस्था असलेली वरील वर्णनाची दुमजली बांधीव मिळकत यांसी चर्तु:सिमा येणे प्रमाणे


पुर्वेस- ६ मीटर रस्ता वापर, पश्चिमेस- प्लॉट नं.१५,
उत्तेरस- याच मिळकतीचा उर्वरीत भाग, दक्षिणेस- प्लॉट नं.१९

येणे प्रमाणे वरील दुमजली बांधीव मिळकत श्री.राहूल रामकृष्ण पाटील, रा.प्लॉट नं.२, गोपाळनगर, धुळे, ता.जि.धुळे यांच्या मालकीची आहे व ताबे उपभोगातील वहिवाटीतील आहे. येणेप्रमाणे वर्णन असलेल्या वरील दुमजली बांधीव मिळकत आमचे पक्षकार यांनी वरील मिळकतीचे मालकांशी वरील दुमजली बांधीव मिळकत खरेदी करण्याच्या दृष्टीने व्यवहार केलेला आहे. तरी तमाम लोकांना या सदरच्या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की वरील मिळकतीवर कोणाताही बोजा नाही. बाकी मिळकत निर्बेध, निर्जोखीम व बोजारहित असल्याचा भरवसा आमचे पक्षकारास वरील मालकांनी दिलेला आहे. असे असतांनाही सदरच्या वरील वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, दान, लिज, लिन, बक्षिस, साठेखत, विसार पावती, तारण कर्ज, बोजा, करारमदार, अन्नवस्त्र, पोटगी, मनाई हुकूम, ताबा, अदलाबदल, भाडे करार, कोर्ट कचेरी हुकूम, वादविवाद, करारनामा, कर्ज बोजाची, कसलाही हक्क, हितसंबंध अधिकार असल्यास त्यांनी सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दहा दिवसांचे आंत कायेदशीर कागदोपत्री लेखी खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे त्यांच्या ऑफीसला पुराव्यानिशी लेखी हरकत दाखल करावी व आमची व आमचे पक्षकारांची खात्री पटवून द्यावी. वरील मुदतीत कोणीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार दाखल न केल्यास सदर वरील दुमजली बांधीव मिळकतीवर कोणाचाही कोणताही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे गृहित धरुन समजण्यात येईल. सदरची जाहिर नोटीस आमचेमार्फत पक्षकारांनी दिलेल्या माहितीनुसार व सांगितलेवरून प्रसिध्दीस दिले असे.

ठिकाण- धुळे, दिनांक- ०७/०६/२०२६.

**ॲड.जयवंत झेड.पाटील,** (नोटरी), भारत सरकार
२१८, जयहिंद कॉलनी, देवपूर, धुळे. **मो.नं.९४२२७९१६०५**

**प्रकाश में आज**
**बटवारा**




धर्मेंद्र, डिम्पल, विनोद खन्ना, अमृतसिंग, शम्माकपूर, आशा पारेख

## पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय शिरपूर जिल्हा धुळे.

**पाहिजेत**

शिरपूर वरवाडे नगरपरिषद संचलित पांडू बापू माळी म्यूनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय शिरपूर जि.धुळे मध्ये सन २०२६-२०२७ या वर्षात सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणारी खालील प्रमाणे नमूद केलेली पदे भरावयाची असून त्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. नं. | पद नाम | किमान शैक्षणिक अर्हता | संवर्ग | एकूण पद व संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक १००% अनुदानित माध्यमिक | कुठल्याही शाखेचा पदवीधर MS-CIT व संगणक टंकलेखन मराठी व इंग्रजी परीक्षा उत्तीर्ण आवश्यक | १ अनु. जाती (S.C) १ इतर मागासवर्ग (O.B.C) १ आर्थीक दृष्टया दुर्बल घटक (EWS) | ०३ |
| २ | प्रयोगशाळा सहाय्क १००% अनुदानित माध्यमिक | बी.एस.सी किंवा डी फॉर्मसी | | ०२ |
| ३ | प्रयोगशाळा सहाय्क अशं:अनुदानित उच्च माध्यमिक | बी.एस.सी किंवा डी फॉर्मसी | | ०१ |

उपरोक्त जात प्रवर्गातील उमेदवारांनी आपली नांवे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र धुळे यांच्याकडेस नोंदविलेली असली पाहिजेत.

सदर जाहिरात प्रसिध्द झाल्या पासून ७ दिवसांच्या आंत आपले अर्ज म.मुख्याध्यापक पां.बा.मा. म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविदयालय शिरपूर जिल्हा धुळे यांच्या नांवे समक्ष अगर पोष्टाने पाठवावीत. अर्जासोबत शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेची गुणपत्रके व प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती तसेच बायोडाटा फोटोसह जोडणे आवश्यक आहे. तसेच अनु.जाती, इतर मागासवर्ग, आर्थीक दृष्या दुर्बल घटक संवर्गातील उमेदवारांनी आपले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

एस. आर. गवळी
सचिव
शालेय शिक्षण समिती
पांडू बापू माळी म्युनि. हायस्कूल,
शिरपूर जिल्हा धुळे

शामकांत जगन्नाथ ईशी
सभापती
शिक्षण समिती
शिरपूर वरवाडे नगरपरिषद
शिरपूर जि.धुळे.

## शब्दकोडे क्रमांक : २३८३



**आडवे शब्द :** १. प्रगती किंवा विकास होणे २. वेळेचे एक माप (६० मिनिटे)४. समुद्रात निर्माण होणारी तरंग ५.दुपार ८.अभ्यासात हुशार नसलेला ९. ललाट १२.पाठलाग १३.सौंदर्य १५. काकांच्या नात्यातील १६. एखाद्या संस्थेचा किंवा मंडळाचा सदस्य१७. सिंहाचा किंवा ढगांचा मोठा आवाज १८. शपथ किंवा प्रतिज्ञा (हिंदी शब्द)२१. लहान गाव किंवा वस्ती २२. बटाटा किंवा डाळीचा एक प्रसिद्ध खाद्यपदार्थ २४. चांदी या धातूला समानार्थी शब्द २६.समाजवादी पार्टी- या शब्दाचे संक्षिप्त रूप २८. मोठ्या आवाजातील गोंधळ ३०. अघोरी प्रथेनुसार माणसाचा दिला जाणारा बळी ३२. अब्रू नुकसानी किंवा अपकीर्ती ३५. थंडी किंवा सुखद थंड हवामान ३७. तळ किंवा पृष्ठभाग ३८. चेहऱ्याचा एक मांसल भाग ३९. पाणी पिण्याची लागलेली ओढ ४१. जुलूम, जबरदस्ती किंवा दाबून टाकणे ४५. प्रियकर किंवा प्रियेसाठी वापरला जाणारा शब्द ४६. हॉटेलमध्ये मिळणारा एक प्रकारचा जाड पाश्चात्य रोट ४७. सर्वांना समान लेखण्याची वृत्ती (समानता) ४९. वर्ष ५३. शीतल हवेची जाणीव ५४. भारताचा राष्ट्रीय प्राणी ५५.झिम्बाब्वे देशाची राजधानी ५७. रात्री न झोपता जागे राहणे ५८. जाड दोरी ५९. शास्त्रीय संगीतातील एक प्रसिद्ध राग

**उभे शब्द ;** १. गाईचे लहान मूल ३.सर्व ४.मुखरस ६.हिंदीत-जावई ७.वस्तू मोजण्याचे एकक १०.पापी ११.मीटिंग १४.फेटा १५.हिंदीत-निवडणूक १६.सज्जड दम १७.शिक्षा २०.शासनकर्ता २१. पहाटे भगवंताला उठवण्यासाठी गातात २२. हुशार २४. बट्टा २६. देह २७. बळासह , बलवान २८. विविध प्रकारचे ३०. कर-हिंदीत ३२. रत्न ३४. तुकडी ३५. सखा ३७. वाद्य सुरेल वाजवणे ४१. पराभव ४३. माया ४४.एक हिंदी सिनेमा ४५. मजदूर ४६.एक पंजाबी पोशाख '**** कमीज '४९. कर्ज घेण्यासाठी ठेवली जाणारी चीज ५२. अतिरेक ५३. शिक्षा ५७. पोपट

### शब्दकोडे क्रमांक : २३८२ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व्य | व | स्था | | त | पा | स | | जा | च | | गो |
| व | हा | न | त | ळ | | व | द | न | | त | मा |
| सा | न | | पा | | ते | ल | | व | र | मा | य |
| य | | का | स | व | | त | ग | र | | श्या | |
| | मा | या | | र | क्त | | दा | | ध | | क |
| चिं | न | | स | ण | | आ | रो | पी | | ना | रा |
| ता | व | दा | न | | च | प | ळ | | स | म | र |
| | ता | न | | का | र | ण | | ता | र | क | |
| व | | व | री | | ण | | वा | प | स | | च |
| र | क्षा | | या | री | | नो | | ट | | पा | व |
| दा | | रा | ज | | प | | आ | | सं | प | दा |
| न | र | म | | पं | त | प्र | धा | न | | ड | र |







# बहर

आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.i



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वातील महान राजे

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाव्दारे घटनात्मक शासनव्यवस्थेची निर्मिती करून स्वराज्याला विश्वरूपी दर्जा पाप्त करून दिला. छत्रपती शिवाजी महाराज सर्वकालीन सर्वश्रेष्ठ राजे होत. किल्ले रायगडावरती ६ जून १६७४ रोजीसाजरा करण्यात आलेला शिवराज्याभिषेक सोहळा म्हणजे स्वराज्याची मंगल पहाट होय. छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य-कर्तृत्व अतुलनीय आहे. यातुन छत्रपतींनी आदर्श जिवनाचा वस्तुपाठ आपल्या समोर ठेविला आहे. समग्र भारताच्या इतिहासामध्ये सुवर्णक्षरांनी कोरुन ठेवावा असा सोनियाचा दिन.हा विश्वातील एक अलौकिक व अपूर्व सोहळा होय.राज्याभिषेकाच्या माध्यमातुन छत्रपतींनी गुलामगिरीच्या जोखडात गुरफटलेल्या समाजाला सार्वभौमत्व व स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. सर्वसामान्य रयतेला जगण्याचा हक्क प्राप्त करून देण्याच्या हेतूनेराज्याभिषेक सोहळा संपन्न करण्यात आला.राज्याभिषेक करून घेणे हे काळाच्या पुढचे पाऊल होते. ही एक वैभवशाली, क्रांतीकारी संविदानाची निर्मिती होती. राज्याभिषेक म्हणजे सार्वभौम व राजनैतिक अधिष्ठानाचा सन्मान होता. जगातील थोर, पराक्रमी आणि मुत्सदी राजांची यादी जर समोर धरली तर छत्रपतींची बरोबरी करणारा मोहरा सापडणे दुर्मिळ. स्वराज्यात राहणा-या सर्वसामान्य रयतेला स्वराज्य आपले आहे असे वाटत होते.म्हणून राज्याभिषेक सोहळा संपन्न केला. आज सर्वत्र शिवराज्याभिषेकोत्सव दिन साजरा होत आहे.हा दिवस भारतासाठी नव्हेतर उभ्या जगासाठी भाग्यदिन होय.

## विश्वरूपी राज्याभिषेक




छत्रपतींनी स्वराज्य हे जागतिक किर्तीचे शासन व्हावे म्हणून दीपवून टाकणारा राज्याभिषेक सोहळा संपन्न केला. गागाभट्ट यांनी राजमुकुट छत्रपतीच्या डोक्यावर ठेवला व 'छत्रियकुलावतंस सिंहासनाधिश्वर श्री शिवछत्रपती यांचा विजय असो' असा जयघोष केला. शनिवार दि ६ जून १६७४ रोजी पहाटे पाच वाजता छत्रपती सिहासनारूढ झाले. किल्ले रायगडावरती एक लाख लोक राज्याभिषेक सोहळ्यासाठी हाजर होते. सर्वसामान्य रयत आपल्या राजाचा सोहळा पाहण्यासाठी आनंदाने किल्यावरती पोहचली होती.देश-विदेशातील लोक मोठ्या प्रमाणात हाजर होते. दिव्यत्वाचा, अव्दभूत प्रतिभेचा, अफाट सामर्थ्याच्यासाक्षात्काराची घटना म्हणजे राज्याभिषेक दिन होय. छत्रपतींचे हे शौर्य म्हणजे भावी पिढीसाठी कोरली गेलेली अखंड प्रेरणागाथाच होय. शिवराज्याभिषेक शकाचा प्रारंभ होऊन भारत देशामध्ये नवी पहाट उगविली. स्वराज्याची ख्याती सर्वदूर पोहचली.छत्रपती शिवाजी महाराजांनी अवघ्या विश्वाने वंदन करावे असे शौर्य गाजविले.त्यांच्या कर्तृत्वाचा ठसासातासमुद्रापार उमटला. त्यांच्या अलौकिक कार्य-कर्तव्याने संपूर्ण विश्वाची अस्मिता जागृत झाली.

छत्रपतींनी एका सार्वभौम स्वराज्यसत्तेची समाजहितकारक मूल्ये रुजविण्यासाठी राजसिंहासन निर्माण केले. काळ, अकाश आणि जमिन यांच्या सीमा जोडणारे आदर्श राजे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज होत, हे सिद्ध झाले. गंगासागरच्या उंच मनो-यावरहिंदवी स्वराज्याचे भगवे निशाण फडकत होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी शिवराई व होन अशी आंतरराष्ट्रीय मान्यतेस पात्रनाणी सुरू केली. या नाण्यांवर त्यांनी 'राजा शिवछत्रपती' अशी अक्षरे कोरली. ही नाणी म्हणजे स्वराज्याच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदू होय.स्वाऱ्या, मोहिमा, टाकसाळी, अर्थव्यवस्थापन, सैन्य, दळणवळण या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यात आले.स्वराज्याच्यासमृद्धीसाठी व्यापक योजना आखण्यात आल्या.

छत्रपती शिवाजी महाराज हे अष्टप्रधान मंडळ निर्माण करून त्याव्दारे शासनव्यवस्था चालविणारे जगातील पहिलेराजे होत. यातुन त्यांनी जगामध्ये एक नविन शासनव्यवस्था निर्माण केली. छत्रपतींचे अष्टप्रधान मंडळ म्हणजे श्रेष्ठप्रशासनाचे आदर्श रूप होते.यावेळी अष्टप्रधान मंडळाची संहिता तयार करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंत्रीमंडळच्या धरतीवरती आज जगभरातील अनेक देशांमध्ये शासनव्यवस्था चालताना दिसते आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची स्वतंत्र अशी शासकीय स्वराज्यमुद्रा होती.महाराजांनी राज्याभिषेकाच्या निमित्याने स्वराज्याची घटना तयार केल्यामुळे स्वराज्याला संविधानात्माक दर्जा प्राप्त झाला. शिवराज्याभिषेक कल्पतरू, लेखनप्रशस्ती, राज्यव्यवहार कोष या ग्रथांची निर्मिती झाली. मराठी भाषेला व लेखन पध्दतीला वैभव प्राप्त झाले. डोळयांचे पारणे फेडणारा हा राज्याभिषेक सोहळा इतिहासाला कलाटणी देणारा ठरला.

भगवा ध्वज हा स्वराज्याचा राष्ट्रध्वज होय. महाराजांनी भगव्या ध्वजाला राष्ट्रीयत्व दिले.छत्रपतींच्या स्वराज्याचा भगवा ध्वज स्वाभिमानाचे प्रतिक आहे.या निमित्ताने स्वतःचे अधिकार व सामर्थ्य यांचे द्योतक म्हणून 'राज्याभिषेक शक' या नावाची स्वतंत्र कालगणना सुरू केली. छत्रपतींनी स्वत:चा राजशक सुरू केल्यामुळे अखिल हिंदूस्थानात स्वतंत्र शासन व्यवस्थेची निर्मिती झाल्याचे जाहिर झाले. त्यासाठी 'करण कौस्तुभ' नावाचा ग्रंथ लिहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर होऊन गेलेल्या राजांनी हाच राजशक चालू ठेवला. राजपदाला लोकप्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठीकालगणना सुरू केली. यातुन एक स्वतंत्र शासन निर्माण झाल्याचे जाहिर झाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासकीय अधिकारी, संरक्षक दल, अष्टप्रधान मंडळ व सैनिक यांना खास गणवेश दिले. शौर्य व कर्तबगारी गाजविणाऱ्यांना मान, सन्मान व पदव्या देऊन गैरविले.जगातील विविध ठिकाणाहुन आलेल्या प्रतिनिधींनी छत्रपतींना नजराने भेट दिले.राजांनी त्यांचा आदर-सत्कार केला.तराजू हे चिन्ह न्यायी राजा म्हणून दर्शित करते. राज्यकारभाराचे प्रतीक किंवा न्यायाचे प्रतीक या अर्थी सोन्याचा तराजू एका सोन्याच्या दांडीला अडकवून छत्रपतींच्या सिंहासनामागे एक सेवक धरून उभा राहात असे. हे चिन्ह फक्त छत्रपतीच वापरीत. महाराजांच्या सिंहासनावरती छत्राकृती छत्र किंवा घुमट असे. छत्रपतींच्या छत्राची काठी सोन्याची किंवा चांदीची असून त्यावरील छत्री रेशमी, मखमली, उंची कापडाची, जरीने कलाकुसर केलेली असे.त्याला मोत्याची झालर लावलेली असे. छत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या वेळी सोन्याचे छत्र धरले. **(पान ६ वर)**

# पावसाळा : निसर्गाच्या नवजीवनाचा आनंदसोहळा

कडक उन्हाळ्याने होरपळून निघालेली धरती जेव्हा आकाशाकडे आसुसलेल्या नजरेने पाहत असते, तेव्हा दूरवरून हळूहळू सरकणारे काळेभोर ढग जणू आशेचे दूत बनून येतात. वातावरणात गारवा निर्माण होतो, वाऱ्याला ओलसर स्पर्श लाभतो आणि पहिल्या पावसाच्या सरी पृथ्वीवर बरसू लागतात. त्या क्षणी दरवळणारा मातीचा सुगंध मनाच्या खोल कप्प्यांपर्यंत जाऊन स्पर्श करून जातो. पावसाळा हा केवळ एक ऋतू नसून तो निसर्गाच्या नवजीवनाचा, माणसाच्या आनंदाचा आणि शेतकऱ्याच्या स्वप्नांचा उत्सव असतो.

*ढगांच्या कुशीतून बरसला श्रावणधारांचा गंध,*
*मातीच्या सुगंधाने भारावला सारा आनंद.*

मराठी साहित्यात अनेक कवींनी पावसाचे अप्रतिम वर्णन केले आहे. कवी बा. भ. बोरकर यांच्या कवितांमध्ये पावसाचा गंध, श्रावणातील हिरवाई आणि निसर्गातील चैतन्य अत्यंत जिवंतपणे अनुभवायला मिळते. तर कुसुमाग्रज यांच्या कवितांमध्ये पाऊस हा नवजीवन, प्रेरणा आणि संघर्षाचे प्रतीक बनून समोर येतो. ग्रेस यांच्या कवितांमध्ये पावसाचा एक हळवा, अंतर्मुख आणि भावस्पर्शी स्वर अनुभवायला मिळतो. म्हणूनच मराठी काव्यविश्वात पावसाळा हा केवळ ऋतू नसून भावनांचा आणि संवेदनांचा उत्सव मानला जातो.

*ये रे घना, ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना...*

भारतात जून ते सप्टेंबरदरम्यान येणारा पावसाळा हा संपूर्ण सृष्टीसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. उन्हाळ्याच्या प्रखर झळांनी कोरडी पडलेली जमीन पावसाच्या थेंबांनी जिवंत होऊ लागते. झाडांच्या वाळलेल्या फांद्यांना नवी पालवी फुटते. डोंगर-दऱ्या हिरव्या शालीने सजतात. नद्या, नाले, तलाव आणि विहिरी पाण्याने भरून वाहू लागतात. जणू निसर्ग स्वतःच नववधूप्रमाणे नटून सजून उभा राहतो. पावसाच्या सरींनी पृथ्वीवर पसरलेली हिरवाई डोळ्यांना सुखावणारी असते. झाडांच्या पानांवर साचलेले मोत्यांसारखे थेंब, ढगांच्या सावल्यांनी भरलेले आकाश आणि धुक्यात हरवलेले डोंगर मनाला वेगळ्याच विश्वात घेऊन जातात.

*श्रावणात घन निळा बरसला,*
*धरतीने हिरवा शालू नेसला.*

पावसाळा आणि शेतकरी यांचे नाते अतूट आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाशी शेतकऱ्याच्या आशा जोडलेल्या असतात. उन्हाळाभर कोरडी पडलेली शेते जेव्हा पहिल्या सरींनी भिजतात, तेव्हा शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर उमटणारा आनंद हा पाहण्यासारखा असतो. अनेक दिवस आकाशाकडे लागलेल्या नजरा शांत होतात. यंदा पाऊस वेळेवर यावा ही त्याची प्रार्थना असते. कारण पाऊस म्हणजे त्याच्या जीवनाचा आधार, त्याच्या कष्टाचे फळ आणि कुटुंबाच्या भवितव्याची आशा असते.

*काळ्या मातीत राबणारा तो शेतकरी राजा,*
*पावसाच्या प्रत्येक थेंबात पाहे सुखाचा साज.*

पहिला पाऊस पडताच गावागावांत शेतकामांची लगबग सुरू होते. कुणी बैलजोडी सजवत असतो, कुणी



नांगरणी करत असतो, तर कुणी बियाण्यांची तयारी करत असतो. शेतात नांगर फिरताना मातीचा दरवळणारा सुगंध आणि बैलांच्या गळ्यातील घंटांचा नाद वातावरणात वेगळेच चैतन्य निर्माण करतात. पेरणीच्या दिवसांत शेतकरी अक्षरशः मातीशी एकरूप होऊन काम करताना दिसतो. पावसात भिजत, चिखलातून चालत तो अखंड मेहनत करत राहतो. कारण त्याला माहिती असते की आजची मेहनत उद्याचे सोन्यासारखे पीक घडवणार आहे.वेळेवर आलेला पाऊस म्हणजे शेतकऱ्यासाठी आनंदाचा सणच असतो. पेरणीनंतर काही दिवसांनी जेव्हा हिरवेगार अंकुर जमिनीतून बाहेर डोकावतात, तेव्हा त्याच्या डोळ्यांत समाधान चमकू लागते. शेतात डोलणारी पिके पाहताना त्याच्या मनात भविष्याची अनेक स्वप्ने फुलू लागतात. कधी तो पावसात भिजत पिकांची निगा राखतो, तर कधी आकाशाकडे पाहून आणखी पावसाची प्रार्थना करतो. त्याच्या आयुष्यातील आनंद हा निसर्गाशी जोडलेला असतो. भरघोस पीक आले की त्याच्या घरात आनंद नांदतो, मुलांच्या शिक्षणाची आशा निर्माण होते आणि कष्टाचे चीज झाल्याचे समाधान मिळते.

डॉ. राजेंद्र रामदास अहिरे,
साक्री मो. ९८६०३६४७९३

शेतकरी हा केवळ अन्नदाता नसून निसर्गाचा खरा मित्र आहे. पहाटेच्या धुक्यातून शेताकडे जाणारा शेतकरी, चिखलातून चालत पिकांची काळजी घेणारा त्याचा संघर्ष आणि तरीही चेहऱ्यावर असलेले समाधान मनाला भावून जाते. त्याच्या कष्टामुळेच संपूर्ण समाजाच्या जीवनाला आधार मिळतो. म्हणूनच पावसाळा हा शेतकऱ्याच्या श्रमांचा, आशांचा आणि आनंदाचा खरा उत्सव मानला जातो.

पावसाळा म्हटला की बालपणाच्या आठवणीही नकळत जाग्या होतात. येरे येरे पावसा, तुला देतो पैसा... या कवितेच्या ओळी गुणगुणत पावसात भिजण्याचा आनंद काही वेगळाच असतो. शाळा सुटल्यावर मित्रांसोबत रस्त्याच्या कडेला साचलेल्या पाण्यात कागदाच्या होड्या सोडताना मिळणारा आनंद निरागसतेने भरलेला असतो.

*कागदी होड्यांतून वाहत गेले बालपण,*
*पावसाच्या सरींमध्ये दडलं होतं निरागस जीवन.*

हातात रंगीत छत्री, अंगावर रेनकोट आणि पावसाच्या सरींमध्ये उड्या मारत शाळेत जाण्याची मजा प्रत्येकाच्या बालपणीच्या आठवणीत कायम जिवंत असते. बाहेर कोसळणारा पाऊस, खिडकीतून दिसणारी हिरवाई आणि हातात गरमागरम चहाचा कप या क्षणांत एक विलक्षण शांतता दडलेली असते. कांद्याची भजी, वाफाळती कॉफी, भाजलेल्या मक्याचे कणीस आणि पावसाच्या सरी यांचा अनुभव म्हणजे सुखाची सुंदर व्याख्याच असते.

पावसाळा हा पशुपक्ष्यांसाठीदेखील जीवनदायी असतो. उन्हाळ्यात तहानलेले प्राणी पाणवठ्याकडे धाव घेतात. पक्षी आनंदाने चिवचिव करू लागतात. मोर पिसारा फुलवून आनंदाने नाचताना दिसतो. हिरव्या कुरणांवर गुरेढोरे मुक्तपणे चरू लागतात. संपूर्ण सृष्टीत नवजीवनाची एक सुंदर लहर निर्माण होते. पाऊस जणू प्रत्येक सजीवाला नव्या उमेदीने जगण्याची प्रेरणा देतो.

पावसाच्या सरींमध्ये निसर्गाचे सौंदर्य अधिक खुलून दिसते. धुक्याने वेढलेले डोंगर, पाण्याने भरून वाहणारे धबधबे, हिरवाईने नटलेली शेते आणि पावसाच्या थेंबांत चमकणारी फुले पाहताना मन हरवून जाते. झाडांच्या पानांवरून अलगद ओघळणारे पाण्याचे थेंब जणू मोत्यांच्या माळाच भासत असतात. संध्याकाळच्या वेळी ढगांमधून डोकावणारा सूर्य आणि आकाशात उमटणारे इंद्रधनुष्य निसर्गाच्या कलेचे अद्भुत रूप दाखवतात.

तथापि, पावसाळ्याचे काही दुष्परिणामही आहेत. कधी अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होते, रस्ते खराब होतात आणि जनजीवन विस्कळीत होते. अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागते. तरीसुद्धा पावसाचे महत्त्व कमी होत नाही, कारण जीवनाचा आधारच पाण्यावर अवलंबून आहे. पाऊस नसेल तर शेती नाही, अन्न नाही आणि जीवनही नाही.

आजच्या आधुनिक काळात पर्यावरणाचा समतोल बिघडत चालल्याने पावसाचे स्वरूपही बदलताना दिसते. कधी अवकाळी पाऊस, तर कधी दुष्काळ यामुळे शेतकरी चिंतेत सापडतो. म्हणूनच वृक्षसंवर्धन, जलसंधारण आणि पर्यावरण रक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. निसर्ग टिकवला तरच पावसाळ्याचे हे सुंदर रूप कायम राहील.

एकूणच, पावसाळा हा आनंद, नवचैतन्य, निसर्गसौंदर्य आणि आशावाद यांचा अद्भुत संगम आहे. पावसाच्या प्रत्येक सरीसोबत माणसाच्या मनातील कोरडेपणाही धुऊन निघतो. हा ऋतू माणसाला निसर्गाशी पुन्हा जोडतो, बालपणाच्या आठवणी जाग्या करतो आणि शेतकऱ्याच्या कष्टांना नव्या आशेची पालवी देतो. म्हणूनच पावसाळा हा केवळ ऋतू नसून जीवनाचा उत्सव आहे हिरवाईचा, श्रमांचा, आनंदाचा आणि नव्या स्वप्नांचा उत्सव.




तप्त उन्हाने भाजून निघालेली धरती जेव्हा पहिल्या पावसाचा शिडकावा अंगावर घेते, तेव्हा सृष्टीचा श्वासच मोकळा होतो.

आकाशात काळे ढग दाटून येतात आणि विजेच्या लकेरीसह टपोऱ्या थेंबाचा पहिला तडाखा मातीवर पडतो... आणि क्षणात मातीचा तो सुगंध - मृद्गंध - आसमंतात दरवळतो. तेच तर खरं स्वर्गीय अत्तर! वाळून गेलेली झाडं दोनच दिवसांत हिरवीकंच होतात. कोरड्या फांद्यांना कोवळी पालवी फुटते. शेतात पडलेली भेगाळलेली जमीन हिरव्या रोपांनी झाकून जाते. रानातलं गवत, डोंगरावरचा दगड... सगळीकडे हिरवाईचं पातं पसरतं. जणू कुणी हिरवा शालूच पांघरला धरतीने.

पहिल्या पावसाचा थेंब अंगावर पडला की लहान पोरं तर भिजायला घराबाहेर पळतातच. आला रे आला पाऊस आला करत नाचतात. शाळेतून येताना मुद्दाम डबक्यात पाय आपटत येतात.


तरुण पोरं मित्रांसोबत भिजत-भिजत चहा प्यायला जातात. प्रियकर-प्रेयसी एकाच छत्रीत चालताना अजून जवळ येतात.

आणि घरातली म्हातारी माणसं? ती खिडकीत बसून पाऊस बघतात. त्यांच्या डोळ्यात आठवणींचा पाऊस पडतो. आमच्या वेळी असाच पडायचा म्हणत जुन्या गोष्टी सांगतात. अंगणात तुळशीजवळ दिवा लावून देवाचे आभार मानतात.

उन्हाने काहिली झालेल्या अंगावर जेव्हा गार वाऱ्यासोबत पावसाचे थेंब पडतात, तेव्हा मनात चुल पेटल्यासारखं वाटतं - पण ती चूल दुःखाची नाही, तर आनंदाची. काळजाला गारवा देणारी. सगळे शीण, सगळा थकवा धुऊन निघतो. पाऊस फक्त पाणी नाही पाडत... तो आशा पाडतो, हसू पाडतो, जगण्याची उमेद पाडतो. म्हणून तर तो आला की लहानांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सगळ्यांच्या चेहऱ्यावर एकच भाव असतो - निखळ आनंद!

काल अचानक आभाळ भरून आलं आणि माझ्या मनात एक बालसुलभ प्रश्न रूंजी घालू लागला. मी खिडकीबाहेर हात काढून पावसाच्या पहिल्या थेंबांना हातावर झेललं आणि पावसालाच विचारलं, मित्रा, तुझं नक्की वय काय रे?

पावसानं जे उत्तर दिलं, त्याने माझं मन तृप्त झालं. पाऊस म्हणाला, जर तू पावसात सैरभैर होऊन आनंदात धावत असशील, तर माझं वय १० वर्षे समज. जर तुला पावसात कविता सुचत असेल, तर माझं वय १६. जर या थेंबांमध्ये तुला कोणाचा विरह जाणवत असेल, तर माझं वय १८. जर तुला ट्रेकिंगला जावंसं वाटत असेल, तर आणि



जर तुला कोणासाठी तरी गजरा घ्यावासा वाटत असेल, तर माझं वय २४ वर्ष समजावं. आणि हो, जर मित्रांसोबत गरमागरम भजी खाण्यात तुला सुख वाटत असेल, तर माझं वय ४० ! मी गोंधळून म्हणालो, अरे, असं शब्दात गुंतवू नकोस, एक काय ते वय सांग! तेव्हा पाऊस हळूच हसला आणि म्हणाला, तू मला जसा अनुभवशील, तेच माझं वय!

विकास कपोले

पावसाचं हे उत्तर थेट काळजाला हात घालतं. पाऊस म्हणजे केवळ एक ऋतू नाही, तर ती एक भावना आहे, जी वयाच्या आणि मनाच्या प्रत्येक टप्प्यावर नव्याने जन्माला येते.

म्हणूनच आपल्या भारतीय चित्रपटसृष्टीने पावसाच्या प्रत्येक वयाला आणि रूपाला संगीताच्या सुरांनी सजवलं आहे.

जेव्हा पाऊस सोळा किंवा अठरा वर्षांचा म्हणजेच तरुण असतो, तेव्हा तो प्रेमाचा दूत बनतो. मराठी मनावर अधिराज्य गाजवणारं नभ उतरू आले, चिंब उलटून गेले किंवा चिंब भिजलेले रूप सजलेले, पाण्यातूनी आले रसरसून ही गाणी आठवली की पावसाचं ते देखणं, शृंगारिक रूप डोळ्यांसमोर उभं राहतं. त्याहून पुढे जाऊन मला वेड लागले प्रेमाचे म्हणत पावसात भिजणारी नायिका आपल्याला प्रेमाच्या एका वेगळ्याच जगात घेऊन जाते.

हिंदी सिनेमाने तर पावसाला रोमान्सचा प्राण मानलं आहे. राज कपूर आणि नर्गिस यांचं एकाच छत्रीखालील प्यार हुआ इकरार हुआअसो, की किशोर दांच्या आवाजातील अवखळ एक लडकी भीगी भागी सी, या गाण्यांनी पावसाचं तारुण्य अमर केलं आहे. जेव्हा राजेश खन्ना आणि शर्मीला टागोर रूप तेरा मस्ताना, प्यार मेरा दिवाना, भूल कोई हमसे ना हो जाये असं गातात, तेव्हा पार्श्वभूमीत कोसळणारा पाऊस त्या प्रेमाची तीव्रता द्विगुणित करतो. तर आज रपट जाये तो हमें ना उठैयो मधील अमिताभ बच्चन आणि स्मिता पाटील यांचा पाऊस मनाला थिरकायला लावतो.

पाऊस जसा बाहेर पडतो, तसाच तो आतल्या आतही कोसळत असतो. कधी आठवणींचा पूर आणून, तर कधी जुन्या गाण्यांचे सूर आळवू लागतो

वय वाढतं तसा पाऊस अधिक समजूतदार आणि काहीसा गंभीर होऊ लागतो. मग त्या संथ पडणाऱ्या थेंबांमध्ये विरहाची झालर जाणवते. अशा वेळी गुलजार साहेबांचे शब्द आणि आर. डी. बर्मन यांचं संगीत आठवतं ***रिमझिम गिरे सावन, सुलग सुलग जाये मन किंवा पानी पानी रे खारे पानी रे, नैनो में भर जा*** पावसाचं हे रूप डोळ्यांच्या कडा ओल्या करणारं असतं. ९० च्या दशकातील ***रिमझिम रिमझिम, रुमझुम रुमझुम, भीगी भीगी रुत में तुम हम हम तुम*** हे गाणं ऐकताना मनाचा कोपरा न कोपरा शहारून उठतो.

मराठी भावविश्वात गदिमा आणि सुधीर फडके यांनी रुजवलेलं सखी मंद झाल्या तारका किंवा सुरेश भटांची अजरामर गझल मलमली ***तारुण्य माझे, तू पहाटे पांघरावे*** ही गाणी ऐकताना पाऊस आपल्या आठवणींचा गाव कसा जिवंत करतो, याची जाणीव होते. त्यातच जेव्हा लाडकी आशाताई ***नका ग बाई रडू, पावसाची आली गाडी किंवा पाऊस आला, गारा आल्या गाते,*** तेव्हा बालपणीचे दिवस डोळ्यांसमोर तरळतात.

आजच्या या धावपळीच्या युगात आपण वयाचे पन्नास-साठ उंबरठे ओलांडले तरी, जेव्हा खिडकीबाहेर मातीचा सुगंध येतो, तेव्हा मनातलं ते १० वर्षांचं मूल पुन्हा जिवंत होतं. म्हणूनच म्हणावंसं वाटतं, पावसाला स्वतःचं असं वय नसतं. तो चिरतरुण आहे. तो जेवढा जुना, तेवढाच नवा आहे. लहानपणी येरे येरे पावसा, तुला देतो पैसा म्हणणारा हाच पाऊस मोठेपणी घन ओल्या सुवासाचाबनून येतो. 'या पावसाळ्यात वयाची बंधनं बाजूला ठेवा. मनाच्या खिडक्या उघड्या करा आणि या पावसाला मनापासून अनुभवा.'

चला तर मग, लतादीदींच्या सुरातील ***मेघ दे, छाया दे, रामा मेघ दे किंवा काळे काळे ढग रे, बाबा पाणी दे*** अशी आळवणी करत, आणि वादळवारं सुटलं ग, या लोकसंगीताच्या तालावर थिरकत या ऋतूचा सोहळा साजरा करूया. कारण शेवटी, पाऊस आपण जसा अनुभवू, तेच त्याचं खरं वय असतं!

'लगान' चित्रपटातील ***काले मेघा, काले मेघा, पानी तो बरसा दे*** हे गाणं केवळ एका चित्रपटापुरतं मर्यादित नाही, तर ते आज आपल्या संपूर्ण महाराष्ट्राच्या मनातील आर्त साद बनलं आहे. मे महिन्याचा शेवट आला की, अवघा महाराष्ट्र डोळ्यांत चातकाची आस घेऊन आभाळाकडे पाहू लागतो. रणरणत्या उन्हाने होरपळलेली काळी आई (जमीन) आणि शेतात घाम गाळणारा आपला बळीराजा, दोघेही एकाच आशेवर जगत असतात कधी बरसणार माझा पाऊस?

आज महाराष्ट्रातील प्रत्येक कोपऱ्यात, मग तो विदर्भ-मराठवाडा असो, खान्देश असो की पश्चिम महाराष्ट्र, प्रत्येक जण पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. शहरातल्या गच्चीवरून असो की गावातल्या शेताच्या बांधावरून, सुकलेल्या विहिरी आणि धरणांचे कोरडे तळ पाहून मन व्याकुळ होतं आणि ओठांवर नकळत ए. आर. रहमान यांच्या संगीतातील तेच सूर येतात, ***बिजुरी की तलवार नहीं, बूंदों की धार चाहिये...***

पावसाची ही प्रतीक्षा आता संपू दे, नवचैतन्याचा अंकुर फुटू दे आणि काले मेघा ची ही हाक ऐकून वरुणराजाने सुखाची बरसात करावी, हीच आज प्रत्येक महाराष्ट्रीयाच्या मनातील आर्त प्रार्थना आहे.



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

## आनंदी वाटचाल

# श्रद्धा

प्रत्येक मनुष्याची कशावर ना कशावर श्रद्धा ही असतेच. एखादी गोष्ट वास्तविक खरी असो किंवा नसो ,तिचे अस्तित्व मनाला खरे वाटणे याचे नाव श्रद्धा. सत्य शोधून काढणे फार कठीण असते पण कोणतीही गोष्ट श्रद्धेने खरी मानणे सोपे असते, म्हणून श्रद्धा म्हणजे कठीण प्रश्नाचे सोपे उत्तर असे म्हटले जाते. श्रद्धेला विश्वास किंवा मत असेही म्हणतात.

सत्य काय आहे हे माहित नसते तेव्हाच श्रद्धेचा उपयोग असतो. जेव्हा खरी वस्तुस्थिती माहीत असते तेव्हा श्रद्धेची जरुरी पडत नाही.

खरी परिस्थिती माहित असली म्हणजे तिच्याविरुद्ध असणाऱ्या गोष्टींवर श्रद्धा असू शकत नाही आणि कोणी अज्ञानामुळे श्रद्धा ठेवली तरी ते निरुपयोगी किंवा अपायकारक असते.मनुष्य जितका अज्ञानी असतो तितकी त्याची श्रद्धा कोणत्याही गोष्टींवर सहज बसते.मनुष्याचे ज्ञान कितीही वाढले तरी कोणीही केव्हाही पूर्ण ज्ञानी होणे शक्य नाही. किंबहुना प्रत्येकाला ज्ञात असलेल्या गोष्टींपेक्षा अज्ञात गोष्टीच नेहमी जास्त असतात. त्यामुळे अनेक गोष्टींचे अस्तित्व श्रद्धेनेच मानावे लागते. सत्याच्या ज्ञानाचा अभाव श्रद्धेने भरून काढावा लागतो. श्रद्धाही सत्याची पूरक असते. श्रद्धे शिवाय मनुष्याचे क्षणभरही चालत नाही .

गुरु कडून ज्ञानप्राप्ती करून घेताना गुरुजे सांगतो ते सत्य आहे अशी श्रद्धा ठेवूनच ज्ञानसंपादन करावे लागते, म्हणूनच श्रद्धावान पुरुषाला ज्ञानाचा लाभ होतो आणि अज्ञानी व अश्रद्धावान मनुष्याचा नाश होतो .

श्रद्धेचे सामर्थ्य फार विलक्षण असते. एखादी गोष्ट कितीही असंभवनिय किंवा खोटी असली तरी श्रद्धेने ते अगदी खरी आहे असे वाटू लागते.पारलौकिक जीवनाच्या संबंधाने जगातल्या निरनिराळ्या धर्मात इतके परस्पर विरुद्ध सिद्धांत आहेत की ते सर्व खरे असणे अशक्य आहे हे थोडा विचार केला की सर्वांना पटण्यासारखे आहे. पण ज्याची धर्मावर श्रद्धा असते त्याला त्या धर्मात सांगितलेल्या सर्व गोष्टी शब्दशः खऱ्या आहेत असे वाटते .

श्रद्धा हा सर्व धर्माचा पाया आहे. मनुष्याच्या भावनांपैकी श्रद्धाही एक अत्यंत प्रबळ क्रिया प्रवर्तक भावना आहे. मनुष्याचे जीवन सुखी किंवा दुखी होणे यशस्वी किंवा अयशस्वी होणे व त्याच्यापासून इतरांना सुख किंवा दुःख होणे हे पुष्कळ अंशी त्याची श्रद्धा कोणत्या गोष्टींवर आहे आणि ती कितपत तीव्र आहे यावर अवलंबून असते .श्रद्धेमुळे असामान्य धैर्याची व अन्वनित कृपणाची कृत्ये करण्यात येतात. हे युद्धात आणि जातीय दंग्याच्या वेळी दिसून येते.

श्रद्धावान मनुष्याच्या मनाला स्वस्थता बहुता लाभत नाही .तो असमाधानी आणि दुःखी असतो. श्रद्धावान मनुष्याचे मन शांत आणि समाधानी राहते. श्रद्धावान मनुष्ये सामान्यतः सर्व परिस्थिती सुखी दिसतात. मनुष्याच्या स्वभावाचे सात्विक राजसी आणि तामस असे तीन प्रकार आहेत .त्याचनुसार श्रद्धेचेही सात्विक राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. प्रत्येक मनुष्याची श्रद्धा त्याच्या प्रकृती स्वभावा प्रमाणे निरनिराळ्या प्रकारची असते. मनुष्य हा श्रद्धां भय असतो. त्यांचा बराचसा कारभार हा श्रद्धेने चाललेला असतो. यातील ज्या ठिकाणी श्रद्धा असते त्याप्रमाणे तो बनतो. श्रद्धा स्वतःच्या आणि इतरांच्या निर्भेळ सात्विक सुखास आणि ज्ञानप्राप्तीस कारणीभूत होते. ही सात्विक होय. या श्रद्धेमुळे मनुष्याला निरनिराळ्या प्रकारच्या आसक्तीयुक्त इच्छा होऊन तो कर्मे करण्यास प्रवृत्त होतो ती श्रद्धा राजस होय.हाती घेतलेले काम यशस्वी होईल अशी श्रद्धा मनुष्याच्या मनात असल्याशिवाय त्याच्याकडून ते काम पूर्ण जोमाने होऊ शकत नाही. दृढ श्रद्धेमुळे अंगातील काम करण्याचा उत्साह आणि शक्ती वाढते .जी श्रद्धा सत्याकडे डोळे झाक करून ठेवलेली किंवा असत्यावर आधारलेली असते .जिच्यामुळे स्वतःला आणि इतरांना विनाकारण दुःख आणि कष्ट भोगावे लागतात . जिच्या मुळे अज्ञान आणि अनाचार आळस व चुका वाढतात आणि जी मनुष्याला कर्तव्यभ्रष्ट आणि परंपिडा करण्यास जागृत करते ती तामस श्रद्धा होय. सामान्य लोकांच्या मनात स्वर्ग नाटकाबद्दल जी श्रद्धा असते ते तामस स्वरूपाची असते .व्यवहारात स्वार्थी धूर्त लबाड आसुरी वृत्तीची मनुष्ये स्वतःच्या अयोग्य फायदा करिता अज्ञानी व भोळ्या व लोकांच्या मनात अनेक प्रकारच्या तामस सुद्धा निर्माण करतात.

काही मनुष्य मुळातच श्रद्धाळू असतात. व त्यांची श्रद्धा कोणत्याही गोष्टींवर सहज बसते. पण काही मनुष्य चिकित्सक आणि संशयी असतात त्यांची श्रद्धा सहसा कशा वरही बसत नाही.

मनुष्य कोणताही स्वभावाचा असो एखादी गोष्ट त्याच्या मनावर वारंवार बिंबवली गेली तर थोड्या फार काळाने ती अगदी खरी आहे अशी श्रद्धा त्याच्या मनाला पटते आणि तिच्या संबंधाने श्रद्धा उत्पन्न होते. लहानपणापासून ज्या गोष्टीचे संस्कार मनावर होत राहतात त्या गोष्टी मनुष्याला खऱ्या वाटतात हा अनुभव आपल्यालायेतो.



पिढ्यान पिढ्या जे संस्कार मनावर झालेले असतात त्यांच्यासंबंधीची श्रद्धा मनात फारच बुद्ध मूल होते व ती मनातून काढणे फार कठीण असते .जेव्हा कोणत्याही गोष्टींवर मनुष्याची दृढ श्रद्धा बसते तेव्हा त्या गोष्टी जागे पणी किंवा झोपेत स्वप्नांच्या रूपाने डोळ्यासमोर प्रत्यक्ष घडत आहे असे मनुष्याला दिसू शकते. मनुष्याला कोणते कार्य करावयाचे असो त्या कार्यात यश मिळेल अशी दृढ श्रद्धा त्याच्या मनात असावी लागते तशी दृढ श्रद्धा असली म्हणजे यश प्राप्ती पूर्वीच यशाचा चित्रपट मनुष्याच्या डोळ्यासमोर दिसू लागतो. यशाच्या चित्रपट डोळ्यापुढे दिसू लागणे ही दृढ श्रध्दे ची खूण असते असे म्हणण्यास हरकत नाही . दृढ श्रद्धे मुळे जसा यशाचा चित्रपट डोळ्यासमोर दिसे लागतो तसाच यशाचा चित्रपट मुद्दाम डोळ्यासमोर वारंवार उभा करीत गेल्याने कार्यावरील निष्ठा आणि यश प्राप्ती विषयी श्रद्धा वाढत जाते व त्यापासून यशप्राप्तीला फार मदत होते.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

## उमलत्या कळ्या

# मागणं

जुईली खरचं सांग....तुलाअभिजित पसंत आहे ना?

बाबा, मलाअभिजित पसंतआहे.तुमच्या शब्दाबाहेर मी जाणार नाही.

'बेटा, हेच नकोय आम्हाला. आमच्याइच्छेसाठी तू तुझे मन मोडून एखाद्या मुलाला हो म्हणणं आम्हाला अजिबात आवडणार नाही.

बाबा, दरवेळी मी माझं मत स्पष्टपणे मांडते. लग्नाबाबतच्या माझ्या कल्पना आणि इच्छा यांविषयी मी तुमच्याशी आणि आईशीही मोकळेपणाने बोललेय.अभिजितशी मी काही मुद्यांवर बोलले तेव्हा लक्षात आलाय की आमचे विचार एकमेकांना पूरक ठरू शकतात. त्याचे विचार माझ्या कल्पनांच्या आड येणारे नाहीत. तसा दिसण्यातही तो सुंदर आहे. एकूणच काय तर अभिजित मला पसंत आहे. असं म्हणताच जुईली मनोमन लाज- ली निझटदिशी ती आपल्या खोलीकडे निघून गेली.

जुईलीच्याआईबाबांना केवढा आनंद झाला. एकुलत्या एक मुलीच्या लग्नाची कितीतरी स्वप्नं दोघांनी रंगवली आहेत. आपल्या लेकीचा कायम आठवणीत राहील असा लग्नसोहळा करण्यासाठी त्यांनी काय काय तयारी केली आहे. गेली दोन वर्ष जुईलीला योग्य असा वर शोधण्यात गेली तरी लग्नकार्य थाटात करण्याचा दोघांचा उत्साह तसूभर कमी झालेला नाही. योगायोगाने अगदी जवळच्या परिसरातील आणि परिचयातील अभिजीतचं स्थळ सांगून आलं नि लग्नकार्याला भलताच वेग आला.

उद्या सकाळीच अभिजितच्या आई-बाबांना निरोप द्यायचा, असं डॉ. शेखर आणि डॉ. मेघा यांनी विचारांती ठरवलं. जुईलीचं लग्न मोठ्या थाटामाटात तर करायचं, शिवायलग्नसोहळ्यात नव्याने ट्रेंड म्हणून आलेल्या नव्या-जुन्यापद्धतींचा मिलाफ, आकर्षक रचना यांचा मेळ घालून आठवणीत राहील असा लग्नसोहळा करायचा. लग्नात कोणाकोणाला बोलवायचं, कपडे कुठे खरेदी करायचे. जुईलीला दागिने कुठून करायचे अशा कितीतरी मुद्द्यांवरशेखर आणि मेघा यांची चर्चा चालू होती.

बाबा मला लग्नात फार थाटमाटनकोय! जुईली सकाळीच बाबांच्या कानाला लागली.

शेखरला वाटले की पोरीने रात्री आपल्या गप्पा ऐकल्या की काय? पण क्षणात भानावर येत तो म्हणाला, ज्याचं लग्न असतं, त्याने नुसतं लग्नाला उभं रहायचंकाम करावं. बाकी जिम्मेदारी आमची!

अस्स कसं? ज्याचं लग्न आहे, त्याच्या मर्जीप्रमाणे सगळं काही व्हायला हवं.

अगंबेटा!तुझं लग्न थाटामाटात नाही, पण आमच्या मनासारखं करायची आमची इच्छा आहे.

बाबा, लग्नातील विधी, पूजा, संस्कार मला मान्य आहेत. मात्र अवाजवी खर्च टाळता आला तर मला अधिक आवडेल.

तू फार व्यावहारिक विचार करू नकोस. तुझ्या शिक्षणासाठी आम्ही जशी आर्थिक तरतूद केली होती, तशीच तुझ्या लग्नासाठीहीकाही रक्कम बाजूला करून ठेवली आहे.

मग त्यात्तील काही रक्कम वाचवा नि मला द्या.

कशासाठी हवे तुला पैसे? आणि लग्न सोहळ्यासाठी ठेवलेल्या रक्कमेतीलचपैसे का हवेत तुला?

बाबा, तुम्ही आणि आईने आतापर्यंत मला



हवे ते दिले. आताही मी तुमच्याकडे काहीतरी मागणं मागतेय असं समजा.

जुई, तुला आम्ही कधी, कशालानाही म्हणालोतका?सांग तुझ्या मनात आहे तरी काय?

तेवढ्यातमेघा कॉफीचे तीन कप घेऊन दिवाणखान्यातआली. स्वतः सोफ्यावर बसत कॉफीचे कप प्रत्येकाच्या हातात देत विचारले.

काय चालली आहे इतकी गुप्त खलबतं बापलेकीची?

आई, मी काय म्हणतेय. लग्नाच्या खर्चात काटकसर करून आपण उरलेल्या पैशातून निवडक सेवाभावी संस्थाना मदत करूया का?

शेखर आणि मेघा दोघेही आपल्या लेकीचे, जुईलीचे बोलणे ऐकून एकमेकांकडे पाहू लागले.

अशा तर पायलीच्या पन्नास सेवाभावी संस्था आहेत. कोणा-कोणाला आपण मदत करायची?

अगंआई! आपल्याला जेवढं शक्य आहे, तेवढं करूया. थोडं-थोडं का होईना, आपला वाटा त्या सेवेत देऊ या.

जुईली, तुझं म्हणणं पटतय मला. असंच असेल तर आपण लग्न यथासांग पारपाडूच, शिवाय तुझ्या कल्पनेप्रमाणे सेवाभावी संस्थाना मदतही करू.

बाबा, तुम्हीआईलासांगतहोते की मला लग्नमंडपात नेण्यासाठी सजवलेली डोली मागवणार आहात. सामानाच्या यादीत दहा हजारांचे फटाके लिहिल्याचे मी पाहिलेआहेत. दीड लाखांचा डी.जे. वाजवण्यापेक्षापारंपरिक सनई-चौघडा मला आवडेल. मला डोली नको. फटाकेतर अजिबात नको.

मला वाटते की दिव्यांगासाठी काम करणाऱ्या आपल्या परिसरातील काही संस्थानाआपण मदत करायला हवी.

आई, तू अगदी माझ्या मनातलं बोल-लीस. अशा काही संस्थाची माहिती मी आधीच मिळवली आहे. या संस्थांचे दिव्यांगाच्यापुनर्वसनातमोलाचं योगदान आहे.

आपण असं केलं तर....... शेखरने बोलणं थांबवलं नि दोघींकडे पाहिले.

कायबाबा? काय केलं तर..... जुईलीने अधीरतेने विचारले.

लग्नात जमलेला सगळाआहेर आपण या संस्थानादान केला तर...

बाबाखरचं! ग्रेटआयडिया! आपण तसचं करू. काय गं आई, तुझं काय म्हणणं आहे?

जुई अशा संस्थामुळे कितीतरी दिव्यांग मुलांच्या आईवडीलांनाकिमान मोकळा श्वास तरी घेता येत असेल. दिव्यांग मुलांना सांभाळण काय असतं हे आपण आपल्या अविनाशच्या रुपात अनुभवलयं. स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलयं.

आई,तू खरचं ग्रेट आहेस. बाबा, ठरलं तर मग!आपण शक्य असेल त्यात काटकसर नक्की करू या. मात्र लग्नातल्या वेगवेगळ्या विधी, पूजा मला हव्या आहेत हं!

तुझ्या मनासारखं होईल. तू निंश्चित रहा. शेखर निश्वास टाकत म्हणाला.

मगलग्नपत्रिका छापून वाटप करणे, मंडप, सनई-चौघडा यांचा मेळ घालणे, कपड्यांची, दागिन्यांची खरेदी करणे ते जेवणातील मेनूठरवणे इथपर्यंतच्या धावपळीतदोन महिने कसे गेले कोणालाच कळले नाहीत.

अभिजितआणि जुईलीच्या लग्नमंडपात काही अंध मुले-मुली अक्षता घेऊन सोफ्यावर बसली होती. त्यांचे नवेकोरे कपडे,त्यावर शिंपडलेलं अत्तर नि निरागस चेहऱ्यावरील आनंद साऱ्या लग्नमंडपाची शोभा वाढवत होते. यथासांग लग्नविधी पार पडल्यानंतरशेखरने काही निमंत्रित सामाजिक संस्थाच्या प्रमुखांना लग्नमंचावरआंमत्रित केले. नववधूच्या हस्ते ठराविक रक्कमेचे धनादेश संस्थाप्रमुखांच्या हा-तात दिले, तेव्हा टाळ्यांच्या आवाजाने सारा लग्नमंडप शहारून गेला होता.

# भुई बोलाले लागनी...

मिरिगना मव्हरेज इतला तितला पडेल पानीघाई भुईनी पुरती तीस बी पुरी व्हयनी नही, तिले पुरता थंडावा बी भेटना नही ते उलटी तिन्हा म्हानी बठठी आग बाहेर निघाले लागनी आनी बठठा लोके दिनभर घामन्या धारांघाई वल्लाचीम व्हवाले लागनात. आसं रोजज व्हवाले लागन. समद्याकायनी थंडी हावा जराखितरी आंगले लागो म्हनिसनी आज मी बाहेर आंगलमा जाई बठाना इचार करीसनी बाहेर जावानीगुंता उठनू तितलामाज लिंबूपानीना भरेल गल्लास माले व्हवुनी आनी दिधा. तो गल्लास ल्हिसनी मी घरना मव्हरला आंगलम्हाना बगीच्यामानी बंगईवर जाई बठनू.

बंगईवर बठिसनी मी लिंबूपानीना एक,दोन घोट पिन्हू तितलामाज, व बईन,तू ते थंडी ना गुंता आठे भाईर वारबागे इ बठनी ना... पन तुले लागी ऱ्हायनी का थंडी हावा ? आसं बोलन मन्हा कानवर उन.मी आथ तथ, इबाक तिबाक दख ते माले कोणीज दखायन नहीं. मंग मी बागे बागे लिंबूपानी सराव आनी रिकामा गल्लास घरना वटटावर ठिसनी आखो बंगईवर जाई बठताज

आवं बईन,झाडन पान बी हाली नही ऱ्हायन दख.झाड बी ते उगमुगज हुब शे. हाई आयकिसनी मी आखो समदीकडे दख ते कोनीज दखात नई पन बोलन ते आयकू ई ऱ्हायनं. ' कोन बोलत व्हई माय ? 'आसं मी मन्हा मनमा म्हनीज ऱ्हायनू तितलामा जसं काय मन्हा मनम्हान आयकिसनीज आवं ताई,मी भुई बोलू ऱ्हायनू भुई....

हाई आयकिसनी माले ते वज्जीज नवल वाटन. ' आह्या माय, भुई काय बोलस का ? आनी ती बोली तरी कसी ? ' आसा इचार मी मनमा करता करताज आवं बईन,मज्जानी थंडी हावा येवानी गुंता आशा एक दोन नही ते गंजकज झाडे जोयजेत.मी ते दख.. दिनभर सूर्यनारायन न समदाच परकार न ऊन आंगवर ल्हेस म्हणीसनी समद्याकायनी, रातनी जराखी तरी थंडी हावा भेटो आसं माले बी वज्जी वाटस पन काय करू ती बी माले भेटस नही ना आनी आशा येय ना वारे कव्हय बी पडणारा इतलासा पानीघाई ते मन्ही समदी आग वऱ्हे चाली येस. मंग ऱ्हास मी आसीज आग पंघरिसनी. आनि आते ते म्हव्हरना पाच वरीसम्हा मन्हामानी आग न परमान आखो बी वाढावं से आसं संशोधकसनी सांगेल से म्हने आसं बी मन्हा कानवर वनं. तुम्हनं बर शे बईन इजवर चालनारा पंखा बिंखा वापरिसनी तुम्हले जराखी तरी थंडी हावा भेटी जास पन मन्ह काय ? मी ते चांगलीज पापडना मायक भुनजाई जास.पन आपलावर आशी येय येवानी गुंता तुम्हीन मन्हा समदा लेकरेज जबाबदार सेतस हाइबी बठठासनीज ध्यानमा लेवाले जोयजे ना.

भुईनं बोलन आयकिसनी मी वज्जीज इचारमा पडनू हाई दखिस नी आवं बईन मी तुलेज नही ते तुन्हागतज मन्हा समदा लेकरेसलेज सांगस ते तुम्हीन माले धरती,वसुधा, वसुंधरा, अवनी, मही, रसा,भूमी,पृथ्वी आसा गंजज नाये पचारतस. इतलज नही ते भू माय, धरनी माय, काई माय आस म्हनीसनी मायनी जागा बी देतस माले. मंग मी बी मायना मायकज तुम्हले जीव लाइसनी तुम्हनी कायजी बी ल्हेस. तुम्हना पालन पोषन नी करता मी आकसीज प्रयतक करी ऱ्हास पन तरी बी देवबा कधय कधय मन्हा हातले यश देस नही.कारन येयवर जोयजे तितला पानी पडस नही मंग मन्हा वटीम्हाना बीजसले, काही वर इयेल बिजांकुरसले पानीना पुरता वल्लावा भेटस नही ऊनमा त्या करपाई जातस. पुरतं धान पिकस नही आनि मंग म्हनीसनीज मन्हा समदा लेकरेसले दखिसनी मन्हा जीऊ गार व्हस नही. मन्हा काही लेकरे नोकरदार शेतस त्या पैसा मोजिसनी खरेदीना हकदार



व्हतस पन मन्हा काही लेकरे मोलमजुरी करणारा बी शेतस. त्यासन काय ?त्या कशा जगथीन आसा इचार म्हा मी वज्जी हैरान व्हस. रात दिन ऊन तान्हमान राबणारा मन्हा बळीराजा ते नांगरनी पाईनज धान्यानी आस मनम्हा धरीसनी घरमा येनारी मानीक मोतीसनी रास सपनमा रोजज दखत ऱ्हास पन हाई मज्जान सपान दखता दखताज कधय वल्ला दुसकाय ते कधय कोल्ला दुसकाय पाडीसनी मन्हा बळीराजाना हाते तोंडे इयेल घास हानी पाडस देवबा. मंग कर्जाना वझाखाल वाकेल मन्हा बळीराजा हवालदील व्हइसनी मोकय आभाय दखत बसस आनि ते दखत दखतज जीव वर उदार व्हइसनी जगान सोडिसनी कायमना निंघी जास.... हाई समद दखीसनी मन्हा जीव वज्जी काल्यावाल्या करस. मन्हा काईजनी उलथा पालथ व्हस आनि मंग ' आसी कसी माय से मी या लेकरेसनी आस माले वाटीसनी मन्हाज राग बी येस माले पन मी करू तरी काय ? मंग मन्हा मनमा सूर्यनारायनले भेटाना इचार उना.मी किलवानी व्हइसनी निंघनू बी त्याले भेटानी गुंता पन त्यान्ही आनि मन्ही वाट ते बराबरनी शे तो ते माले कधयज भेटाव नही हाई मन्हा ध्यान मा येताज मी हेटेथीनज त्यान्हासंगे बोलाले लागनू ते तो मालेज समजाडी सनी सांगाले लागना.... दख, मी ते मन्ह काम नेमबन करस. तुन्हा भू भागवर जीतल पानी शे तितला समदा पानीनी मी वाफ करस पन आखोबी वाफ करानी गुंता तुन्हाकडे पुरतं पानीज नही शे ना. मंग मी तरी काय करू ? मंग मी मेघुराजाकडे दखीसनी मेघुराजा मेघुराजा तू काब रे रुसना ? येता येताज आसा काब रे थांबना ? आसं मन्ह हाई बोलनं आयकिसनी तो बी माले सांगाले लागना...

मी काय करू ? कसा बरसू ? मी ते बरसीसनी तुले भेटानी गुंता वज्जी वज्जी तरसस पन बरसानी गुंता माले पुरीपाठी थंडी हावा भेटस नही ना. आनि आशी थंडी हावा माले झाडेसना बिगर कोन दी बर सांग ? तुन्हा लेकरेसनी ते झाडे तोडीसनी, जथा तथा सिरमेटना जंगले उभा करीसनी,थंडी हावा हिसकाईसनी तुन्हा मन्हामा वज्जी वज्जी आंतर दिन्ह पाडी

मेघुराजानं हाई बोलन आयकिसनी मी ते ठायकेज इरमाई गवू. मन्ह हाई जीनंज माले नको नको शे वाटाले लागनं.कारन मानुस सनी म्हनजे मन्हा लेकरेसनीज झाडेसवर,त्यासना मुयांसवर कुऱ्हाड ना घाव घालीसनी मन्हापाईन झाडेसले आल्लग करी टाकं. हाई समद सोसता सोसता मन्ह मन दुखाईनी मन्हा वज्जी हिरमोड झाया. पन सूर्य,पानी,हावा,आभाय आसा आम्हना समदाज पर्यावरनीय रुपेसनी आम्हनी जोड शे.म्हनीसनी यासना व्हढा धरीसनीज मी सूर्यनारायन आनि मेघुराजाना संगे बोलनू . मंग त्यासनं म्हननं आयकिसनी आपीआप मन्हाज लेकरेसनी चूक मन्हाबी ध्यानमा उनी.म्हनीसनी आज मी मन्हा समदाज लेकरेसले सांगस.....

विमल पाटकरी
धुळे मो.९३५९१५७३६७

हाई दखा मन्हा लेकरेसव्हन,झाडे आपला समदासनी ज गुंता गह्यरा उपेगी शेतस.झाडे मन्हीं धूप थांबाडतस, मन्ही जितली बी झीज व्हयेल ऱ्हास ती भरी काढतस,मन्हा कस बी वाढवतस इतलज नही ते समदा सजीव सिरसटीले जगानी गुंता लागनारा श्वास बी झाडेज देतस.फुले,फये,सावली देतस.अन्न, कपडा आनि घर या मानवी जीवननी गुंता लागणाऱ्या आवश्यक गरजा बी झाडेज पुरा करतस. हाई समद ते तुम्हले समदासलेज मालुंग शे ना मंग तरीबी तुम्हीनं आशा का ब वागतस ? झाडे तोडीसनी मन्हावर झाडेसनं सरन रचतस पन त्याम्हा मन्हज मरन व्हस आसं माले वाटस पन तुम्हले हाई समजतज नही ना.

मी आज समदीकडे दखस ते काय.... महामार्गानी चारपदरी वाट करानी गुंता त्या वाटवर येणारा पहिले लायेल आनि आपीआप उगायेल धाकला मोठा समदाज झाडे येली कोनताबी इचार नही करताज खुशाल जे सी बी मशिनघाई मुयांसपाईन काढातस तव्हय जीव जावान्या येदना व्हतीस माले.झाडेसन्या मुया नही ते त्यासनी नायज मन्हमाईन धटाधट तुटाना वज्जी तरास व्हस मन्हा जीऊ मनले.इतलज नही ते मन्हा आतकाईज माईन काहीतरी, कोनीतरी गमाई गय आसं वाटीसनी हाई जीनं जगानी आपक्षाज ऱ्हास नही माले. महामार्गाना वाटवर येनारा जमीनना मालकसले ते जमीनना बदलामा भू मोठी रक्कमना खजिनाज भेटस पन मन्ह काय ? मन्हा इचार कोनीज करस नही.

पन मंग आसा परस्थितिम्हा बी ' मीज आसी हिंमत हारनू ते मन्हा समदा सजीव सिरस्टीनं काय व्हई ? ' आसा इचार मन्हा मनमा येताज मी मन्हा मनले समजाड....ते नही नही आते जे व्हयनं ते व्हयनं पन म्हवरे आसं काही नही व्हवाले जोयजे म्हनिसनी मी नटी थटीनी आखो लिसू गरतीना साज. पन आसं समदज न्यामी व्हवानी गुंता माले तुम्हनी म्हणजे मन्हा समदाज लेकरेसनी जोयजे साथ.म्हनिसनी हाई दखा मन्हा लेकरेसव्हन मी काय सांगस ते नेंबन आयका......

समदासना परवास येयवर आनि सुखना व्हवानी गुंता, व्हनारा अपघात टायानी गुंता,आपला येय बी वाचाडानी गुंता तुम्हीन खुशाल करा महामार्गाले चारपदरी. पन वाटमा येनारा आनि बख्खय जागावरना जितला झाडे तोडात तितलाज डबल झाडे आखो लाइसनी त्यासनं जतनबी करा ' एक लेकरू एक झाड ' ' मानुस परत एक झाड ' ' परतेकनी आपला वाढदिनले एक झाड लावा ना ' आसा न्यारा न्यारा उपक्रम दरसाल राबाडात आनि धार्मिक कामनी गुंताज नही ते कोणताज कामनी जागानी गुंता झाडे तोडताना इचारज सोडी दिन्हा ते मंग मी आखो निय्यी निय्यी गार व्हसू, गरतीनं लेनं लिसू. मंग मेघुराजालेबी थंडी थंडी हावा भेटी तोबी आननमा बरसी.त्यान्ही मन्ही भेट बी व्हई.नद्या,तयाव,समिंदर या समदा कटेकट भरथीन आनि मंग धोंडी बनिसनी पानी मांगानी येय मन्हावर कधयज येवाव नही.पण हाई समद घडानी गुंता मी तुम्हना समदासना जोडे हात जोडीसनी झाडे लावाना आनि त्या जगाडाना जोगवा मांगस . मंग दिशात ना तुम्हे समदा मिइसनी माले मन्हा हावू जोगवा.द्या रे लेकरेसव्हन माले जोगवा द्या रे.

हाई समद आयकता आयकता सूर्यनारायन मावयानी येय कधय व्हयनी ते ध्यानमाज उन नही. दिनमावतनी दिवा लावानी येय झाई. घरमा जाईसनी मी लाईट लावा.हात पाय धुईसनी देवना मव्हरे दिवा लावा आनि हात जोडीसनी देवले नमन करता करताज झाडे लावाना आनि त्या जगाडाना जोगवा हात जोडीसनी मांगनारी धरनी मायनी किलवानी इनंती मन्हा मनले आयकू उनी म्हनीसनी आपीन स मदासनीज झाडे लावाना आनि त्या जगाडाना इडा उखलाले जोयजे आसा इचार मन्हा मनमा उना.




***शब्दांना नसतात पंख, तरीही ते दूरवर उडतात !***
***एक अनमोल शब्दासाठी, माणसं नाती जोडतात !!***

'शब्द' म्हणजे भावनांचे प्रतीक. शब्द केवळ अक्षरांचा समूह नाही तर, माणसाच्या भावना, विचार व अनुभव व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे.

शब्दात अफाट ताकद आहे. प्रेम, राग, आनंद, दुःख अशा प्रत्येक भावनेला शब्दाची साथ लागते. गोड शब्द माणसाला जवळ आणतात, तर कटू शब्द नात्यांमध्ये दुरावा निर्माण करतात. 'शब्द' माणसाच्या मनाचा आरसा आहे, जे की मनातील विचार जगासमोर ठेवतात. आपल्या एका शब्दामुळे निराश, हताश व्यक्तीला नवीन प्रेरणा व ऊर्जा मिळू शकते. योग्य वेळी बोललेले प्रोत्साहनाचे शब्द माणसाचे आयुष्य बदलू शकतात. कार्यक्रमात सत्कार, सन्मान, आदर करण्यासाठी शब्द सुमनांचा वापर केला जातो. संत, कवी व समाजसुधारकांनी आपल्या शब्दांच्या ताकदीने समाजात परिवर्तन घडविले.

शब्द तलवारीपेक्षाही अधिक प्रभावी असतात. म्हणतात ना मुखातून एकदा शब्दाचा तीर निघाला तर तो परत येत नाही, म्हणूनच नेहमी विचारपूर्वक शब्द वापरावेत. शब्दांचा उपयोग हा नेहमी प्रेम ,आदर आणि सकारात्मकतेसाठी करावा.

'शब्द 'हे ज्ञानाचे वाहक आहे. शब्दाच्या सन्मानपूर्वक वापराने व्यक्तिमत्व उंचावते, तर शब्दांचा गैरवापर म्हणजेच अभद्र, अपशब्द बोलण्याने मान सन्मान, प्रतिष्ठा खालावते.

'शब्द 'हे मनाला स्पर्श करतात, म्हणून म्हटले जाते की,

***शब्दांची जादू अशी की, काळजाला भिडते !***
***कधी जखम देते, तर कधी मलम बनून उरते !!***

सौ जयश्री बिर्ला,
आईसर पुणे मो. ९४०४०५६८४३






# खानदेशातील समाजसुधारक आणि समाजसेवक



प्रा.डॉ.संजय ढोडरे
मो.९८२२५३३६४२

**माझा खान्देश**

खानदेशातील समाजसुधारक आणि समाजसेवक

खानदेशातील जनजीवन तुलनेने शांत असली तरी ते स्थिर व जडवत नव्हते. हे खानदेशच्या इतिहासाचे अवलोकन केल्यावर दिसून येते.बराच काळ शिक्षणाचा अभाव असूनही खानदेशातील लोक आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सतत जागरूक राहून वेगवेगळे चळवळी करीत असताना दिसलेली आहेत. खानदेशातल्या चळवळींचा इतिहास येथल्या चैतन्यदायी समाजाची खरी ओळख पटवतो.

### आपश्री 'गुला' महाराज-

समाज सुधारणेच्या ज्या अनेक लहान मोठ्या चळवळी खानदेशमध्ये तत्कालीन काळात झाल्या त्यात तत्कालीन पश्चिम महाराष्ट्र व आताच्या नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा जवळच्या मोरवड (रंजनपुर)येथील आदिवासी संत श्री.गुला महाराज यांची व्यसनमुक्तीची चळवळ महत्त्वाची आहे. आदिवासी समाजात दारू, गांजा,चिलीम व अन्य व्यसनांचे प्रमाण खूपच मोठे होते. श्री. गुला महाराज यांनी ही व्यसनाधीनता कमी व्हावी यासाठी अटोकाट प्रयतक केले. समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात असे सुधारणावादी प्रयतक करणारी खूप लोकं त्याकाळात खानदेशात होते, त्यातील आपश्री 'गुला' महाराज एक महत्त्वपूर्ण नाव आहे.

गुन्हेगार जात म्हणून ब्रिटिश प्रशासनाने ज्या भिल्लांवर शिक्का मारला, त्या दारिद्र्यात, व्यसनाधिनतेत खितपत पडलेल्या भिल्ल बांधवांना वसाहतवादी व्यवस्थेने शोषणाचे साधन मानले. अशा समाजात उदयास आलेल्या गुला महाराज या भिल्ल सुधारकाने भिल्लांना नवा मार्ग दाखविला. या संत आपश्री गुला महाराजांनी आपला 'संपद्राय निर्माण न करता, आदिवासींमध्ये मोठी जागृती घडवून आणली.

गुला महाराज म्हणून सर्व दूर परिचित असलेल्या सुधारकाने पश्चिम खानदेशातील आत्ताच्या नंदूरबार जिल्ह्यातील तळोदे-मोरदड या भागात भिल्लांना व्यक्तिगत जीवनात स्वच्छतेची शिकवण देऊन गावोगावच्या भिल्लांना एकत्र करून मद्यपानाच्या व्यवसायापासून दूर राहण्याचे आवाहन केले. मोरवड येथे आदिवासी भागातून भिल्ल, पांढरपेशावर्ग मोठ्या प्रमाणावर एकत्र येऊन गुला महाराजांचे विचार ऐकू लागला. आरती होऊ लागली. 'आरती चळवळ' मोठ्या प्रमाणावर प्रभाव निर्माण करीत असतांना मद्य, मांस सेवनाचे प्रमाण लोकांत कमी होत गेले. आरती चळवळ एक सामाजिक, धार्मिक चळवळ बनली. गुला महाराजांच्या सामाजिक चळवळीमुळे आदिवासी जीवनात सुधारणा होऊन गावोगावच्या भिल्लांमध्ये चांगले राहणीमान, निर्व्यसनी जीवन या गोष्टी दिसू लागल्या. मद्याचा खपही कमी होऊ लागला. बुवाबाजी, पाखंडीपणा, स्वार्थीवृत्ती, प्रचारकी थाट, लुबाडणूक अशी दोष-रहीत आरती चळवळ आदिवासी स्त्री-पुरुषांची सुधारणा चळवळ बनली. शासकीय तथा सनदी नोकरवर्ग देखील या चळवळीचा असाच अनुभव घेत होता. विधायक अशा आरती चळवळीला मात्र पुढील काळात अपयश आले. रामदास महाराजांच्या काळात स्वातंत्र्य आंदोलन, आरती चळवळीतील काही अंगभूत दोषांमुळे ती अपयशी ठरली. सरकारचा दृष्टिकोनही या चळवळीबद्दल सहानुभूतीचा नव्हता.

### मुन्शी मीर शुक्रुल्लाह मीर फर्जदअली उपाख्य पूर्व खानदेशचे गांधी-

आपल्या प्रामाणिक समाजसेवा कार्याबद्दल पूर्व खानदेशचे गांधी म्हणून मुन्शी मीर शुक्रुल्लाह यांना ओळखले जाते. काँग्रेस भक्त असलेले मुन्शी मीर शुक्रुल्लाह यांनी आपल्या साध्या राहणीतून सर्वधर्मीय, बहुजातीय समाजात सुसंवाद कसा नांदेल,यासाठी शेवटपर्यंत धडपड केली. हिंदू-मुस्लीम शीख ऐक्यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. खादी ग्रामोद्योग उत्पादन प्रचार, राष्ट्रीय शिक्षण, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण या महात्मा गांधींच्या विधायक कार्यक्रमात मीर शुक्रुल्लाह यांनी सक्रीय सहभाग घेऊन, खिलाफत समितीच्या माध्यमाने पूर्व खानदेशात हिंदू-मुस्लिम ऐक्याचा संदेश दिला. जळगाव शहरातील हिंदू-मुस्लिम, तणाव प्रसंगी सुसंवाद घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या त्यांच्या धोरणामुळे मुस्लीम बांधवांची नाराजी त्यांनी ओढवून घेतली. त्यांच्या हयातीत जळगावात दंगल झाल्याचे उदाहरण नाही. गणेश उत्सवात ते हिंदू-मुस्लीम ऐक्यावर व्याख्याने देत. मुंबई इलाखाभर त्यांनी दोनवेळा दौरा काढला होता. ते सर्वधर्मसमभावाचा सतत प्रचार करीत. गुरुनानक जयंती प्रसंगी त्यांनी पुण्यात केलेले 'हिंदू-मुस्लीम-शीख' ऐक्यावरील भाषण प्रभावी झाल्याची माहिती तत्कालीन वृत्तपत्रांनी दिलेली दिसून येते. दारूबंदी, अस्पृश्यता निवारण, खादी प्रचार यासाठी मुन्शीजींनी लक्ष घातले. पूर्व, पश्चिम खानदेशातील असंख्य कार्यकर्त्यांशी त्यांनी सेवाकार्यातून संबंध जोडले. मुन्शीजींनी राष्ट्रीय शिक्षण प्रसाराच्या कार्यात सक्रिय राहून मुस्लीमांच्या शिक्षणासाठी त्यांनी विधायक भूमिका घेऊन मुस्लीमातील अज्ञान घालविण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता स्पष्टपणे मांडली. त्यासाठी शिक्षणसंस्था उभारणीतही पुढाकार घेतला. मुस्लिमांतील अनिष्ट रूढींना फाटा दिला पाहिजे असे आवर्जून सांगितले. मागासलेल्या मुस्लिम समाजाला खरा मार्ग दाखविला. सेवा कार्यात साने गुरुजी, अण्णासाहेब दास्ताने, श्री. अण्णासाहेब सोनाळकर, देवकीनंदन नारायण चक्रवर्ती, धनाजी नाना चौधरी अशा मान्यवरांशी त्यांचा संबंध राहिला. मतभेद असूनही मुन्शीजी भांडले नाहीत. आपल्या वक्तृत्वाने ते श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत. या त्यांच्या सेवाकार्यामुळे त्यांना 'पूर्व खानदेश गांधी' म्हणून संबोधले गेले.

### कर्मयोगी दादासाहेब धनाजी नाना चौधरी-

पूर्व खानदेशातील रचनात्मक कार्यात झोकून देऊन अस्पृश्यता निवारण, दारुबंदी या विधायक कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. हरिजन गिरीजनांच्या उद्धारासाठी झटणारे थोर सेवक धनाजी नाना चौधरी यांचे सामाजिक सेवा कार्यातील योगदान मोठे आहे. सन्मानाची नोकरी सोडून राजकीय चळवळीत सक्रिय होत असतांना समाज परिवर्तनाच्या लढ्यात दादासाहेब अग्रेसर राहिलेत.

महात्मा गांधींच्या प्रेरणेने दादासाहेबांनी आपल्या रचनात्मक कार्याची सुरूवात खिरोदे येथे करून, खादी प्रचार कार्यात स्वतःचे कुटुंबीय आणि सहकारी गुंतविलेत. गांधींचा संदेश खेड्यापाड्यातून पोहचवून, खिरोदे येथील 'आश्रम लोकशिक्षणाचे केंद्र' बनविले. स्त्री-पुरुष समानता, स्वावलंबन याची शिकवण गावोगावी दिली.

आरोग्य सेवा, रस्ते दुरुस्ती, खादी प्रचार कार्य, ग्रामीण स्वावलंबन यासाठी दादासाहेबांनी सेवाभावी कार्यकर्ते तयार करून खिरोदे परिसरातील जनतेच्या अडचणीत मोठी मदत केली. अस्पृश्यता निवारण कार्यात सवर्णांसोबत हरिजन मंडळीस जेवण देणे, चहापान, पूजा-प्रसाद, प्रार्थना यातून अस्पृश्य बांधवांना सहभागी करून समाजमन घडविण्याचे कठीण कार्य दादासाहेबांनी केले. या कार्यात लोकांना नम्रपणे आपली भूमिका पटवून दिली. हरिजन, तडवी, भिल्ल, मंडळींना ग्रामपंचायतीची अधिकारपदे सोपविलीत. काकासाहेब बर्वे, साने गुरुजी, अण्णासाहेब दास्ताने, गांधींच्या शिष्या सौ. मालतीबाई थत्ते आदी मान्यवरांच्या उपस्थितीत खिरोदे येथील विठ्ठल मंदिर अस्पृश्यांना समारंभपूर्वक खुले करून देऊन मंदिर प्रवेश चळवळीला मोठे समर्थन मिळविले. त्यासाठी गावोगावी भेटी दिल्यात. सहभोजन घडवून आणले. हरिजन सेवक संघाची जबाबदारी सांभाळून अस्पृश्योद्धारासाठी पूर्व, पश्चिम खानदेशातील अनेक उपक्रमातून आपली हजेरी लावली.

हिंदू-मुस्लीम एकता आणि सर्वधर्मसमभावाची मोठी तळमळ दादासाहेबांना होती. खानदेशातील पारोळा-बहादरपूरसारख्या हिंदू-मुस्लिम दंगल झालेल्या ठिकाणांना भेट देऊन सुसंवाद निर्माण करायचा त्यांनी प्रयतक केला. महात्मा गांधींच्या वधानंतर खानदेशात उद्भवलेल्या जातीय तणावाच्या वातावरणात सुसंवाद निर्माण करण्यासाठी दादासाहेब आणि भाऊसाहेब बोंडे सक्रिय राहिलेत. विविध जाती-धर्मांच्या लोकांमध्ये दादासाहेब लोकप्रिय होते.

जनता शिक्षण मंडळाची स्थापना करून या संस्थेच्या विविध शाखा, उपक्रमातून सर्वसामान्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. 'मुलोद्योगी शिक्षण पद्धती'चा पाठपुरावा केला. ग्रामोद्योगाच्या माध्यमाने ग्रामीण जीवनाचा विकास घडवून आणून आदिवासी, हरिजनांच्या उन्नतीसाठी झटत राहिलेत. शेतकरी जीवनाच्या उत्कर्षासाठी विविध योजना राबविल्यात. दादासाहेब धनाजी नाना यांचे जीवन एक समर्पित सर्वोदयी सेवकांचे जीवन असून त्यांनी लोकसेवेसाठी आपले आयुष्य वेचले. सातपुड्यातील आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी 'सर्वोदय केंद्र चालविले. शाळा चालविल्या. थोर लोकसेवकांचा आणि कार्यकर्त्यांचा सहवास त्यांना लाभला, त्यांच्या प्रेरणा घेऊन शेवटपर्यंत दादासाहेब सेवाकार्यात गुंतून राहिले.

क्रमशः



सीए नरेंद्र नेरपगार
मो.९६७३७३०८९५

**अर्थवेध**

आजच्या काळात व्यवसाय करण्याची पद्धत खूप बदलली आहे. मोठे उद्योग, नवीन तंत्रज्ञान, जागतिक व्यापार आणि जास्त भांडवलाची गरज यामुळे कंपनी ही व्यवसायाची एक महत्त्वाची आणि सोपी पद्धत बनली आहे. एकट्याने किंवा भागीदारीपेक्षा कंपनीच्या रूपात व्यवसाय करणे जास्त सुरक्षित आणि स्थिर मानले जाते. आज उत्पादन, सेवा, बँकिंग, माहिती तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात कंपन्या काम करत आहेत. यामुळे रोजगार वाढतो, व्यवसाय मोठा होतो आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत होते. त्यामुळे आजच्या आधुनिक काळात कंपनी ही व्यवसायाची सर्वात महत्त्वाची पद्धत आहे.

कंपनी ही इतर व्यवसाय प्रकारांपेक्षा वेगळी असते कारण तिला कायद्याने स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झालेले असते. म्हणजे कंपनीचे अस्तित्व तिच्या भागधारकांपासून स्वतंत्र मानले जाते. कंपनी स्वतः च्या नावाने मालमत्ता धारण करू शकते, करार करू शकते, कर्ज घेऊ शकते तसेच न्यायालयीन कारवाई करू शकते. त्यामुळे कंपनी स्वरूपातील व्यवसाय अधिक विश्वासार्ह, स्थिर आणि दीर्घकालीन विकासासाठी उपयुक्त मानला जातो.

मात्र अनेकांना कंपनीच्या करप्रणालीबाबत पुरेशी माहिती नसते. कंपनी स्थापन केल्यानंतर केवळ व्यवसाय करणे पुरेसे नसून, तिच्यावर विविध कायदेशीर आणि करसंबंधित जबाबदाऱ्या येतात. विशेषतः कंपनीचा आयकर, करभरणा, आयकर विवरणपत्र सादर करणे तसेच लेखापरीक्षण करणे या बाबी अत्यंत महत्त्वाच्या असतात.

याशिवाय भारतातील बहुतांश कंपन्यांसाठी लेखापरीक्षण करणे कायद्याने बंधनकारक आहे. कंपनीचे आर्थिक व्यवहार अचूक, पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत आहेत की नाहीत याची खात्री करण्यासाठी लेखापरीक्षण अत्यंत आवश्यक मानले जाते. लेखापरीक्षणामुळे भागधारक, गुंतवणूकदार, बँका, कर्जदार आणि शासन यांना कंपनीच्या आर्थिक स्थितीबाबत विश्वासार्ह माहिती उपलब्ध होते. त्याचप्रमाणे कंपन्यांना त्यांच्या नफ्यावर नियमानुसार आयकर भरावा लागतो. कंपनीवर लागू होणारे करदर, करपात्र उत्पन्नाची गणना, विविध वजावटी, किमान पर्यायी कर आणि इतर करसंबंधित तरतुदी या सर्व बाबी कंपनी करप्रणालीचा भाग आहेत.

म्हणूनच कंपनी करप्रणाली हा विषय केवळ करभरण्यापुरता मर्यादित नसून, कंपनीच्या आर्थिक व्यवस्थापन, कायदेशीर पालन आणि व्यावसायिक शिस्तीशी संबंधित आहे. या लेखात कंपनी करप्रणाली, करदर, करपद्धती आणि संबंधित महत्त्वाच्या तरतुदीं समजून घेणार आहोत.

### देशांतर्गत कंपन्यांचे आयकर दर :

भारतात देशांतर्गत कंपन्यांवर आकारला जाणारा आयकर कंपनीची उलाढाल, व्यवसायाचे स्वरूप, स्थापनेची तारीख आणि निवडलेली करप्रणाली यावर अवलंबून असतो. सामान्य करप्रणालीनुसार, ज्या देशांतर्गत कंपन्यांची मागील आर्थिक वर्षातील एकूण उलाढाल साधारणतः ४०० कोटींपर्यंत आहे, अशा कंपन्यांना२५% आयकर दर लागू होतो. हा दर मुख्यतः लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी ठेवण्यात आला आहे. तर ज्या कंपन्यांची उलाढाल४०० कोटींपेक्षा जास्त आहे, अशा मोठ्या कंपन्यांवर सामान्यतः ३०% आयकर दर लागू होतो. या सामान्य करप्रणालीत कंपन्यांना विविध करसवलती जसे की अतिरिक्त घसारा, संशोधन व विकास खर्चावरील वजावट, विशेष आर्थिक क्षेत्रातील वजावट लाभ आणि इतर वैधानिक वजावट उपलब्ध असतात.

याशिवाय शासनाने कंपन्यांना पर्यायी आणि सवलतीचे आयकर दर देखील उपलब्ध करून दिले आहेत. आयकर कायद्यातील कलम ११५-BAA अंतर्गत कोणतीही देशांतर्गत कंपनी २२% आयकरदराचा पर्याय निवडू शकते. या पर्यायासाठी कोणतीही उलाढाल मर्यादा नाही आणि सर्व प्रकारच्या देशांतर्गत कंपन्या (उत्पादन, व्यापार किंवा सेवा क्षेत्रातील) याचा लाभ घेऊ शकतात. मात्र हा पर्याय स्वीकारताना कंपन्यांना अनेक करसवलतींचा त्याग करावा लागतो, जसे अतिरिक्त घसारा, विशेष आर्थिक क्षेत्रातील वजावट आणि काही इतर सूट. तसेच या पर्यायात किमान पर्यायी कर लागू होत नाही. हा पर्याय संबंधित आर्थिक वर्षासाठी आयकर विवरणपत्र भरण्याच्या अंतिम तारखेपर्यंत निवडता येतो आणि एकदा निवडल्यानंतर तो बदलता येत नाही. या करप्रणालीत प्रभावी करदर अधिभार आणि उपकर मिळून सुमारे २५.१७% पर्यंत जातो.




तसेच, नवीन उत्पादन उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी कलम ११५BAA अंतर्गत १५% विशेष करदराची तरतूद करण्यात आली आहे. हा करदर फक्त नवीन उत्पादन कंपन्यांसाठी लागू आहे, ज्यांची स्थापना १ ऑक्टोबर २०१९ रोजी किंवा त्यानंतर झाली असावी आणि ज्यांनी ३१ मार्च २०२४ पूर्वी उत्पादन सुरू केलेले असावे. या करप्रणालीसाठी कोणतीही उलाढाल मर्यादा नाही. मात्र कंपनी नवीन असावी आणि जुना व्यवसाय विभाजित करून स्थापन केलेली नसावी. तसेच वापरलेली जुनी यंत्रसामग्री ठराविक मर्यादेपेक्षा जास्त नसावी. या करप्रणालीतही अतिरिक्त घसारा, विविध वजावट आणि किमान पर्यायी कर लागू होत नाही. प्रभावी करदर अधिभार व उपकरासह सुमारे १७.१६% इतका होतो.

एकंदरीत पाहता, कंपन्यांना सामान्य आणि विशेष अशा दोन्ही प्रकारच्या करप्रणाली उपलब्ध आहेत. सामान्य करप्रणालीत विविध वजावटी मिळतात, तर विशेष करप्रणालीत कमी करदर मिळतो परंतु काही सवलतींचा त्याग करावा लागतो. त्यामुळे प्रत्येक कंपनीने आपली उलाढाल, व्यवसायाचे स्वरूप आणि भविष्यातील योजना लक्षात घेऊन योग्य करप्रणालीची निवड करणे आवश्यक आहे

### विदेशी कंपन्यांचे आयकरदर :

भारताबाहेर स्थापन झालेल्या पण भारतात उत्पन्न मिळवणाऱ्या कंपन्यांना विदेशी कंपन्या असे म्हणतात. अशा कंपन्यांवर भारतात फक्त भारतातील उत्पन्नावर कर आकारला जातो, म्हणजेच भारतात निर्माण झालेले, मिळालेले किंवा भारतात झालेले उत्पन्न करपात्र मानले जाते. या कंपन्यांवर सामान्यतः देशांतर्गत कंपन्यांच्या तुलनेत जास्त करदर लागू होतो. साधारणतः विदेशी कंपन्यांवर ४०% मूलभूत करदर लागू केला जातो. हा दर त्यांच्या भारतातील व्यावसायिक उत्पन्न, रॉयल्टी, फी फॉर टेक्निकल सर्व्हिसेस, व्याज किंवा इतर उत्पन्नावर लागू होतो. मूलभूत करदराशिवाय विदेशी कंपन्यांना अधिभार आणि आरोग्य व शिक्षण उपकर देखील भरावा लागतो, ज्यामुळे एकूण करभार वाढतो. अधिभार हा कंपनीच्या एकूण उत्पन्नाच्या पातळीवर अवलंबून असतो, म्हणजेच उत्पन्न ठराविक मर्यादेपेक्षा जास्त असल्यास मूलभूत करावर अतिरिक्त टक्केवारीने अधिभार आकारला जातो. त्यामुळे उच्च उत्पन्न असलेल्या विदेशी कंपन्यांवर अधिक करभार पडतो.


### आरोग्य व शिक्षण उपकर :

आरोग्य व शिक्षण उपकर हा भारतामध्ये कंपन्यांच्या अंतिम आयकर देयकावर लावला जाणारा एक अतिरिक्त कर आहे. हा उपकर ४% या स्थिर दराने आकारला जातो आणि सर्व कंपन्यांसाठी समानपणे लागू होतो, मग ती देशांतर्गत कंपनी असो किंवा परदेशी कंपनी. हा उपकर थेट करपात्र उत्पन्नावर लावला जात नाही, तर आधी गणना केलेल्या आयकर आणि लागू असल्यास अधिभार यांच्या एकूण रकमेवर लावला जातो.

### अधिभार :

भारतातील कंपन्यांसाठी अधिभार हा आयकरावर लावला जाणारा अतिरिक्त कर आहे आणि तो उत्पन्नाच्या ठराविक, कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेनुसार लागू होतो. सध्या देशांतर्गत कंपन्यांसाठी जर एकूण करपात्र उत्पन्न १ कोटी रुपयांपेक्षा जास्त पण १० कोटी रुपयांपर्यंत असेल, तर आयकरावर ७% अधिभार लागू होतो. जर करपात्र उत्पन्न १० कोटी रुपयांपेक्षा जास्त असेल, तर आयकरावर १२% अधिभार लागू होतो. काही विशिष्ट कर पद्धती (जसे की सवलतीच्या दराने कर भरणाऱ्या उत्पादन कंपन्या) यांच्यासाठी अधिभाराचे दर वेगळे असू शकतात, परंतु वर दिलेले दर सामान्य कंपनी कर आकारणीसाठी लागू होतात.

कोणतीही कंपनी स्थापन करण्यापूर्वीच करआकारणी आणि करनियोजन यांचा सखोल विचार करणे आवश्यक ठरते, कारण योग्य पूर्वनियोजनामुळे भविष्यातील करभार कमी होण्यास आणि कायदेशीर गुंतागुंत टाळण्यास मदत होते. तसेच कंपनीच्या संपूर्ण कार्यकाळात करनियमांमध्ये होणारे बदल लक्षात घेऊन सतत अद्ययावत राहणे गरजेचे आहे, जेणेकरून नवीन कायद्यांचा लाभ घेता येईल आणि सर्व कायद्यांपालन योग्य प्रकारे पूर्ण करता येतील. त्यामुळे करनियोजन ही एक वेळची प्रक्रिया नसून ती सातत्याने चालणारी आणि व्यवसायाला दिशा देणारी महत्त्वाची बाब आहे.




# आयकार्ड गळ्यातलं की मनातलं!

चैतन्य आणि चिन्मय रोज सकाळी हातात हात घालून शाळेत जायचे. दोघांचंही जग वेगळंच होतं. एकाने काही पाहिलं की दुसऱ्याने लगेच त्यावर प्रश्न विचारायचा. एक हसायला लागला की दुसराही खळखळून हसायचा. शाळेचा गणवेश घालताना दोघांची छोटीशी लगबग सुरू व्हायची. हा माझा बूट! नाही, हा माझा! आजी, माझी बाटली कुठे? आजोबा, माझं दप्तर भारी दिसतं ना? घरभर त्यांचा आवाज घुमत राहायचा आणि त्या गडबडीतच सकाळ जिवंत व्हायची. शाळेतही दोघं सगळ्यांचे लाडके होते. टीचर काही शिकवत असतील तर दोघं अगदी लक्ष देऊन ऐकत. मित्रांशी भांडण नाही, रडारड नाही. उलट कोणाचं पेन्सिल पडली तर उचलून द्यायचे, एखादं मूल रडत असेल तर त्याच्याजवळ जाऊन बसायचे. कधी कधी टीचर हसत म्हणायच्या, हे दोघं वर्गात आले की वातावरणच बदलून जातं. एक दिवस शाळेत सकाळपासूनच वेगळा उत्साह होता. सगळ्या मुलांच्या गळ्यात रंगीत दोऱ्यांना लटकलेली नवीन आयकार्ड झुलत होती. कोणी आपलं कार्ड मित्राला दाखवत होतं. कोणी त्यावरचा फोटो पाहून हसत होतं. काही मुलं तर वारंवार आरशात पाहत होती. चैतन्य आणि चिन्मयही उत्साहाने सगळं पाहत होते. चैतन्यने हळूच चिन्मयच्या कानात विचारलं, आपलं कार्ड कधी मिळणार? चिन्मय लगेच म्हणाला, टीचर देतील थांब ना! दोघंही रांगेत शांतपणे उभे राहिले. एकामागून एक मुलांना आयकार्ड मिळत गेलं. प्रत्येक वेळी दोघांचे डोळे आशेने चमकायचे. पण शेवटपर्यंत त्यांचं नाव आलंच नाही. थोडा वेळ दोघं शांत उभे राहिले. त्यांच्या चेहऱ्यावरचं हसू हळूहळू कमी झालं. सुट्टीची घंटा झाली. मुलं आनंदाने बाहेर पळाली. गळ्यात आयकार्ड हलत होती. चैतन्य आणि चिन्मय मात्र हळूहळू वर्गाबाहेर आले. गेटजवळ बाबा त्यांना घ्यायला आले होते. बाबांना पाहताच दोघांच्याही डोळ्यांतलं पाणी बाहेर आलं. बाबा चैतन्यचा आवाज थरथरला. सगळ्यांना कार्ड मिळालं चिन्मयने ओठ आवरत म्हटलं, आपल्यालाच नाही दोघंही रडू लागले. बाबांनी लगेच त्यांना जवळ घेतलं. त्यांच्या छोट्या डोक्यावरून हात फिरवला. काही क्षण त्यांनी दोघांना फक्त मिठीतच धरून ठेवलं. मग शांत आवाजात म्हणाले, बाळांनो, तुम्ही चांगले आहात की नाही, हे कार्ड ठरवत नाही. पण त्या छोट्या मनांना तेव्हा ते समजणं कठीण होतं. त्यांना वाटत होतं बाकी सगळ्यांकडे आहे, मग आपल्याकडे का नाही? तेवढ्यात वर्गातील टीचर तिथे आल्या. त्यांनी दोघांचे पाणावलेले डोळे पाहिले आणि त्यांचा चेहरा लगेच मऊ झाला. त्या दोघांच्या जवळ बसल्या. अरे बाळांनो त्या प्रेमाने म्हणाल्या, आज तुमचं आयकार्ड राहून गेलं. कधी कधी मोठ्यांकडूनही छोट्या चुका होतात. दोघं शांतपणे ऐकत होते. टीचर पुढे म्हणाल्या, पण तुमचं नाव आधीच आमच्या यादीत आहे. आणि तुमचं चांगुलपणं आमच्या मनात आहे. चैतन्यने डोळे पुसले. चिन्मयने हलक्या आवाजात विचारलं, उद्या मिळेल? टीचर लगेच हसल्या. उद्या मी स्वतः तुमच्या गळ्यात आयकार्ड घालणार. दोघांच्या चेहऱ्यावर हलकंसं हसू उमटलं. घरी येताना त्यांची पावलं अजून थोडी शांत होती.




पण रडणं थांबलं होतं. त्या रात्री झोपताना चैतन्यने विचारलं, आजोबा खरंच ना कार्ड नाही म्हणून आपण वाईट नाही ना? आजोबांनी त्याला जवळ घेतलं. अगदी नाही रे. चांगुलपणा माणसाच्या वागण्यात असतो. चिन्मय लगेच म्हणाला, मग मी उद्या टीचरला हसू देणार! आणि सगळे हसू लागले. दुसऱ्या दिवशी सकाळी दोघं पुन्हा उत्साहाने तयार झाले. आज त्यांचा मूड वेगळाच होता. शाळेत पोहोचल्यावर टीचरने दोघांना जवळ बोलावलं. टेबलावर दोन सुंदर आयकार्ड ठेवलेली होती. टीचरने आधी चैतन्यच्या गळ्यात आयकार्ड घातलं. मग चिन्मयच्या. दोघंही आनंदाने एकमेकांकडे पाहू लागले. टीचर प्रेमाने म्हणाल्या, हे कार्ड गळ्यात लटकतं पण तुमची खरी ओळख तुमच्या वागण्यात आहे. चैतन्यने कार्ड हातात धरून पाहिलं. चिन्मयने त्यावरचा फोटो पाहून हसू दिलं. आणि मग दोघं हातात हात घालून वर्गात गेले. त्या दिवशी त्यांच्या छोट्या मनाने एक मोठी गोष्ट शिकली होती. ओळख कागदावर छापलेली नसते ती माणसाच्या स्वभावात, प्रेमात आणि वागण्यात जपलेली असते

# शब्दझुला




दोन थेंब डोळ्यातून
पाणी ओघवती अश्रू
पाणी जीवन मरण
डोळे गाळतात अश्रू
पाणी नाम जीवन हे
पाणी घाम कष्टाळूंचे
पाणी काम शेतकरी
पाणी धाम देवबाचे
पाणी सार जीवनाचा
पाणी करी आत्मा तृप्त
पाणी आधार जीवना
पाणी जीवन अमृत
पाणी सांडतो नासतो
पाणी वाया घालवितो
दोन घोट न मिळता
जीव पाणी पाणी होतो
आता सुधर मानवा
पाणी जपाया शिक रे
तुझ्या मुळे वनचरे
ओस पडली बघ रे
पाणी पक्षांना ठेऊया
पाणी जनावरा पाजा
क्षय बघवत नाही
रडे रोज बाप आजा
पाणी आडवा आडवा
पाणी जिरवा जिरवा
झाडे जगवा जगवा
वने वाढवा वाढवा

–चंद्रशेखर प्र. कासार, धुळे




लागे तहान जीवाला
वणवण फिरे गाव...
पाणी कोठेच दिसेना
आता कसं रे जगाव?...
ऊन नुसते तापले
धरणीही भेगाळली....
ढग नुसते फिरती
मोडे जीवनसाखळी....
हंडा धरी डोईवरी
पाण्या जाई भरभर...
घरी मुलं रडे पण
पाण्यासाठी मरमर....
रान सारी शुष्क झाली
वन्यजीव तरसती...
पाण्यासाठी गावामध्ये
साठा पाण्याचा शोधती...
बरसावे पावसाने
वणवण थांबवावी...
घाली साकडे धोंड्याला
तृप्त धरेला करावी....

– विजया भट, धुळे




येवू दे सर सर पाऊस धारा
वाहू दे सुसाट वेगाने मौसमी वारा धृ
भिजून होईल रान हिरवा
जिकडे तिकडे पसरेल गारवा
पक्षूपक्षींचा किलबिलाट सारा
वाहू दे सुसाट वेगाने मौसमी वारा
हिरवी हिरवी मखमली चादर
सजली सृष्टीवर बहु सुंदर
दव बिंदू पाहून फिरती नजरा
वाहू दे सुसाट वेगाने मौसमी वारा
इंद्रधनुष्य दिसते लई भारी
सप्त रंगाने उमटल्या छटा सारी
चारही बाजूंनी फुलला पसारा
वाहू दे सुसाट वेगाने मौसमी वारा
देवा वाहते कर सर्व नदी नाले
सुख शांती समाधान नांदेन घरले
येवू दे धरणीवर पाऊस धारा
वाहू दे सुसाट वेगाने मौसमी वारा

– दिलीप हि. पाटील, कापडणे
मो.नं.९६७३३८९८७३




बघ झाकोळला
आसमंत सारा
सांग नां आता
प्रतीक्षा किती करावी
मी वाट पहाते
चातका सारखी
बरसबरस असा रे
जणु प्रीत झिरपावी
बिलगुनी मिठीत
सारी तनु तृप्त व्हावी
मोह सारे सरुनी
चैतन्य फुले बहरावी
ब्रह्माण्डी विश्वरूप
आत्मशांती लाभावी
हीच एक मनीषा
अंती पूर्णत्वा जावी

– वि.ग.सातपुते




जेष्ठापरी आलास रे
जरी पाऊस जेष्ठाचा
येरे येता येता येरे
पण जरासा इष्टाचा धृ
नको करुस विध्वंस
मनी योजिल्या स्वप्नांचा
आणि साकारु म्हणता
काही नव्या उद्दिष्टांचा
बळी चिंताग्रस्त नको
त्याच्या वरती रुष्टाचा
कर जरासा विचार
अविरत त्या कष्टाचा
अतिरेक्यापरी नको
येऊ कधी अनिष्टाचा
भ्रष्टाचारी परी नको
अन् होऊस भ्रष्टाचा
तृप्त होऊ दे वसुधा
येरे हिरव्या छंदाचा
असा पाऊस वाटतो
व्हावा जेष्ठा रे यंदाचा

– मंगला रोकडे, जळगांव
मो. ९३७१९०२३०३




थेंब थेंब स्वातीतला
बनला ग मोती
बाकी गेले मिसळून
लागले ना हाती..
थेंब थेंब मनातला
ओघळला गाली
दु:ख सारे उन्मळून
मन झाले खाली
थेंब थेंब पावसाचा
जगविली पाती
पिऊनच घेई सारे
आसुसली माती..
थेंब वळवाचे येती
तडातडा खाली
गंधमय खरपूस वसुंधरा न्हाली..
थेंब थेंब दंवाचे ते
चकाकती किती
वाऱ्यासंगे डुलतात
जणू बोलताती..
थेंब थेंब अभिषेक पावन ते नीर
कृपा ठेव आम्हावर
सांगती वेडे पीर..
थेंब थेंब मेघातील
ओलावते माती
ओंजळ ती पदरात
पिकविते मोती..
थेंब अळवावरचा
घरंगळे खाली
क्षणभंगूर जीवन
सांगतो वनमाली..
थेंब थेंब रुधिराचा
अनमोल किती
जगवतो माणसास
टिकवतो नाती..
नेत्रातून ओघळती
विरहात मोती
थेंबा थेंबातून गळे
मनोहर प्रीति..
थेंबे थेंबे तळे साचे
साठवण किती
जप पाण्यास मानवा
सांगते ती नीति..
अपरंपार महती ती
थेंब असे थोर
थेंबासाठी आसुसला
वनात चकोर..,

–प्रा.सुमती पवार, नाशिक

# 'पित्ता'वर विजय मिळवा १० घरगुती उपचारांनी!

**आरोग्यम् धनसंपदा**
**डॉ.नितीन जाधव**
**मो.९८९२३०६०९२**

अपुरी झोप, तणावग्रस्त जीवनशैली , अरबट-चरबट फास्ट फूड खाणे अशा एक ना अनेक कारणांनी शरीरात पित्ताचे दोष निर्माण होतात. तीव्र डोकेदुखी, छातीत जळजळ ,उलट्या होणे ,अस्वस्थ वाटणे अशी पित्ताची लक्षणे दिसून येतात . मग पित्तावर उपाय म्हणून बाजारात उपलब्ध असलेली विविध रूपातील एन्टासिड्स(आम्लता नष्ट करणारा अल्कलाइन पदार्थ) ही निष्फळ ठरतात , तेव्हा आजीच्या बटव्यातील हे काही घरगुती उपचार नक्की आजमावून पहा.

**आरामदायी केळं :**

केळ्यातून शरीराला उच्च प्रतीच्या पोटॅशियमचा पुरवठा होतो त्यामुळे पोटात आम्ल निर्मितीची प्रक्रिया मंदावते . तसेच फायबर शरीराची पचनक्रिया सुलभ करते. फळांमधील काही विशिष्ट घटकांमुळे अम्लांच्या विघातक परिणामांपासून आपले रक्षण होते.

- पित्त झाल्यास पिकलेले केळ खाल्याने आराम मिळतो. केळ्यातील पोटॅशियम विषहारक द्रव्य म्हणून काम करते व पित्ताचा त्रास कमी होतो.

**फायदेशीर तुळस :**

तुळशीमधील एन्टी अल्सर घटक पोटातील/ जठरातील अम्लातून तयार होणाऱ्या विषारी घटकांपासून बचाव करते.तुम्हाला पित्ताचा त्रास जाणवत असल्यास किंवा अस्वस्थ वाटत असेल तर - तुळशीची पाने चावून खा .

**अमृतरुपी दुध :**

दुधातील कॅल्शियमच्या घटकांमुळे पोटात तयार होणारी विघातक आम्ल निर्मिती थांबते व अतिरक्त आम्ल दुध खेचून त्याचे अस्तित्व संपवते . थंड दुध प्याल्याने पित्तामुळे होणारी पोटातील व छातीतील जळजळ कमी होते.

दुध हे पित्तशामक असून ते थंड तसेच त्यात साखर वा इतर पदार्थ न मिसळता प्यावे . मात्र त्यात चमचा भर साजूक तूप घातल्यास ते हितावह होते.

**बहुगुणी बडीशेप:**



बडीशेपमधील एन्टी अल्सर घटक पचन सुधारते व बद्धकोष्ठता दूर करते . बडीशेपमुळे पोटात थंडावा तयार होऊन जळजळ कमी होते. बडीशेपाचे काही दाणे केवळ चघळल्याने देखील पित्ताची लक्षणे कमी होण्यास मदत होते. तसेच पित्तामुळे अस्वस्थ वाटत असल्यास , बडीशेपाचे दाणे पाण्यात उकळून ते रात्रभर थंड करून ठेवलेले पाणी प्यायल्याने आराम मिळतो.

**पाचक जिरं :**

जिऱ्याच्या सेवनामुळे शरीरात काही लाळ निर्माण होते , ज्यामुळे पचन सुधारते , मेटाबॉलीझम सुधारते आणि शरीरातील वायू व गॅसचे विकार दूर होतात . जिऱ्याचे काही दाणे केवळ चघळल्यानेदेखील आराम मिळतो . किंवा तुम्ही जिऱ्याचे दाणे पाण्यात उकळून ते पाणी थंड करून प्या.

**स्वादिष्ट आणि गुणकारी लवंग :**

लवंग चवीला तिखट असली तरीही लवंग अतिरिक्त लाळ खेचून घेते , पचन सुधारते आणि पित्ताची लक्षणं दूर करते . लवंगामुळे पोटफुगी व गॅसचे विकार दूर होतात.

- जर तुम्हाला पित्ताचा त्रास असेल तर लवंग दाताखाली पकडून ठेवा , त्यातून येणारा रस काहीकाळ तोंडात राहू द्या . यारसामुळेच पित्ताची तीव्रता कमी होते. लवंगेमुळे घश्यातील खवखवही कमी होते.

**औषधी वेलची:**

आयुर्वेदानुसार वेलची शरीरातील वात, कफ व पित्त यांमध्ये समतोल राखण्याचे काम करते . स्वादाला सुगंधी व औषधी गुणांनी परिपूर्ण वेलचीच्या सेवनाने पचन सुधारते. पित्ताचा त्रास कमी होतो.

- पित्तापासून आराम मिळवण्यासाठी वेलचीचे दोन दाणे ठेचून (सालीसकट / सालीशिवाय ) ती पाण्यात टाकून उकळा , हे पाणी थंड झाल्यावर प्यायल्याने पित्तापासून तात्काळ आराम मिळेल .

**वातहारक पुदिना :**

पुदिना पोटातील आम्लाची तीव्रता कमी करतो . पुदिन्यातील वायूहारक गुणधर्मामुळे पचनक्रिया सुधारते. पुदिन्यातील थंडाव्यामुळे पोटदुखी व जळजळ थांबते.

- पित्ताचा त्रास होतअसल्यास काही पुदिन्याची पाने कापा व पाण्यासोबत उकळा . थंड झाल्यावर हे पाणी प्या. अपचनावरदेखील पुदिना गुणकारक आहे. पुदिन्यातील मेन्थॉल पचण्यास जड पदार्थ खाल्ल्याने होणारा त्रास , डोकेदुखी तसेच सर्दी दूर करण्यास मदत करतो.

**आल्हाददायक आलं :**

आलं या औषधी मुळाचा भारतीय स्वयंपाकघरात प्रामुख्याने वापर केला जातो . आल्याच्या सेवनाने पचन सुधारते . तसेच पोटातील अल्सरशी सामना करण्यास आल्याचा फायदा होतो . आल्यातील तिखट व पाचकरसांमुळे आम्लपित्त कमी होते.

- पित्तापासून आराम मिळवण्यासाठी आल्याचा एक लहान तुकडा चघळत रहा. तुम्हाला जर आलं तिखट लागत असेल तर ते पाण्यात टाकून उकळून ते पाणी प्या. किंवा तुम्ही आल्याचा तुकडा ठेचून त्यावरथोडा गुळ टाकून चुपत रहा.

पित्तशामक आवळा :

तुरट , आंबट चवीचा आवाळा कफ आणि पित्तनाशक असून त्यातील व्हिटामिन सी , अन्ननलिका व पोट स्वच्छ ठेवण्यास मदत करते .

-रोज चमचाभर आवळ्याची पावडर/चूर्ण घेतल्यास पित्ताचा त्रास होत नाही.

- कच्चा आवळा मिठासोबत खाल्ल्यास शरीरास सर्व रस (षड्रस) मिळतात.


# विश्वरूपी राज्याभिषेक

(पान ३ वरुन) छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यभिषेकासाठी मण सुवर्णाचे सिंहासन बनविले. चौकोनी आकाराचे ते साडेतेरा बाय बाराफूट लांब-रूंद होते. त्याला मौल्यवान अशी रतके जडविण्यात आली होती. आठ रतक्जडित स्तंभ सिंहासनाच्या आठ दिशांना तयार केले होते. राज्यसिंहासनासमोर कारंजी बनविण्यात आली होती. राजसभेचे दालन अत्यंत सुंदर बनविण्यात आले होते. छत्रपतींनी या शुभ प्रसंगी विविध पदे, नियुक्तीपत्रे, धन, घोडे, हत्ती, रतके, वस्त्रे, शस्त्रे, दान केली. ढाल, तलवार आणि इतर शस्त्रांची पूजा केली.

हेन्री ऑक्सेंडेनहा इंगज अधिकारी राज्याभिषेक सोहळयासाठी किल्ले रायगडावर हाजर होता. त्याने त्या दिवसाचे वर्णन केले आहे. ते असे ६ जून १६७४ या दिवशी मी दरबारात गेलो. छत्रपती एका भव्य सिंहासनावर बसले होते. उत्तमोत्तम वस्त्रालंकार परिधान केलेले सरदार, सेनापती आपआपल्या मानाप्रमाणे उभे होते, तर काही बसले होते. सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुशोभित केलेले भाले उभे केले होते. भाल्याच्या टोकावर सत्ता आणि अधिकार यांची निदर्शक चिन्हे होती. उजवीकडील भाल्यावर सोन्याची डोकी असलेले दोन मोठे मासे होते.डावीकडील भाल्यावर घोड्याच्या पुष्कळ शेपट्या होत्या.एका रतक्जडीत भाल्याच्या टोकावर सोन्याचा एक तराजू होता. हा तराजू म्हणजे न्यायाचे द्योतक होते. वाड्याच्या दोन्ही बाजूला दोन लहान हत्ती आणि सोनेरी लगाम व मौल्यवान खोगीर वगैरे घातलेले दोन उमदे घोडे होते. ते घोडे व हत्ती पाहून आम्हास कौतुक वाटले. अशा अवघड गडावर ते कसे आणले गेले.' दि. २६ जानेवारी २०१८ रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली येथील राजपथवर एकूण २३ चित्ररथांचे सादरीकरण झाले. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा या महाराष्ट्राच्या चित्ररथाचा प्रथम क्रमांक मिळाला. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून एशियन संघटनेचे १० नेते उपस्थित होते. सिंगापुर, म्यानमार, कंबोडिया, थायलंड, मलेशिया, व्हिएतनाम, द फिलिपाइन्स, ब्रूनेई, इंडोनेशिया, लाओस या देशाच्या प्रमुखानी छत्रपतींच्या राज्याभिषेक दिनाचे महत्व समजून घेतले.

# स्वत:ला इतकं घडवा की आदर मागावा लागणार नाही!

आजच्या जगात प्रत्येकाला, आणि हवी आहे. लोकांनी आपल्याकडे पाहावं, आपलं कौतुक करावं, आपल्याला महत्त्व द्यावं अशी प्रत्येकाची इच्छा असते. पण खरं सांगायचं झालं, तर आदर हा कधीच मागून मिळत नाही. आदर मिळवावा लागतो आपल्या स्वभावाने, विचारांनी आणि कर्तृत्वाने!




आज अनेक तरुण सोशल मीडियावर लाईक्स, फॉलोअर्स आणि व्ह्यूजमध्ये स्वत:ची किंमत शोधताना दिसतात. एखाद्या पोस्टला कमी लाईक्स आले की मन खट्टू होतं, आणि जास्त आले की स्वत:ला यशस्वी समजलं जातं. पण खरं यश मोबाईलच्या स्क्रीनमध्ये नसतं तर आपल्या विचारांमध्ये, मेहनतीमध्ये आणि व्यक्तिमत्त्वात असतं.

फक्त मनाने नाही, तर डोक्यानेही जगायला शिका!

भावना खूप सुंदर असतात, पण प्रत्येक वेळी भावनांच्या भरात घेतलेले निर्णय योग्य असतीलच असं नाही. आयुष्यात काही वेळा शांत राहून विचार करणं, परिस्थिती समजून घेणं आणि योग्य निर्णय घेणं खूप महत्त्वाचं असतं. कारण जो व्यक्ती स्वत:च्या भावना नियंत्रित करू शकतो, तोच आयुष्याचा खरा खेळ जिंकतो.

प्रत्येकाला आपल्या आयुष्यात जागा देऊ नका!

आज अनेक लोक फक्त गरज असेल तेव्हाच जवळ येतात. काही लोक तुमचं मन समजून घेत नाहीत, पण तुमचा उपयोग कसा होईल हे मात्र चांगलं समजतात. म्हणूनच आयुष्यात आपल्या सभोवती कमी लोक असले तरी चालतील, पण ते विश्वासू असले पाहिजेत. राजासारखं जगा

जिथे तुमचं वर्तुळ छोटं असेल, पण तुमची किंमत मोठी असेल! सगळ्यात मोठं ज्ञान म्हणजे स्वत:ला ओळखणं! ज्या दिवशी तुम्ही स्वत:च्या ताकदी, चुका, भावना आणि स्वप्नं समजून घ्याल त्या दिवशी जगातील अनेक प्रश्नांची उत्तरं आपोआप मिळतील. कारण जग बदलण्यापूर्वी स्वत:ला घडवणं आवश्यक असतं.

आज गरज आहे ती स्वत:ला सिद्ध करण्याची. लोकांना प्रभावित करण्याची नाही, तर स्वत:ला मजबूत बनवण्याची! स्वत:वर मेहनत करा, स्वत:वर विश्वास ठेवा आणि असा व्यक्ती बना की तुमचं नाव घेताच लोकांच्या चेहऱ्यावर आदर दिसला पाहिजे.



**सुमेध रानडे**
**मो.९५६१०९३७४०**

# राशी भविष्य

**मेष :** हा सप्ताह तुमच्यासाठी खोळंबलेला काळ घेऊन येत आहे. गोष्टी अडकल्यासारख्या वाटतील. पटापट काही घडणार नाही. त्यामुळे तुम्हाला बेचैन वाटू शकतं. कामाच्या ठिकाणी तेच तेच काम करुन कंटाळा येण्याचा संभव आहे. मनातून उत्साह कमी राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्याकडे जे चांगलं आहे, त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. जे नाही त्यामुळे स्वत:ला त्रास करुन घेण्यापेक्षा आहे त्यात आनंद मानायला शिका. इतरांमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर संयम ठेवा, माणसं आणि नाती पटकन तोडायला जाऊ नका.

**वृषभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी एकंदरीत आनंदाचा आणि समाधानाचा असणार आहे. जे पाहिजे ते मिळण्याची खूप शक्यता आहे. एखादे लहान ध्येय पूर्ण होईल. कलेतून किंवा छंदातून आनंद मिळेल. कुटुंबामध्ये काही कारणाने आनंद राहील, एकोपा राहील. बिघडलेले संबंध सुधारतील. या आठवड्यात तुम्ही तुमच्या ध्येयावर पूर्ण मेहनत करण्याची गरज आहे. शेवटचा टप्पा आला आहे, हा पार करताच यश येणार आहे म्हणून चिकाटीने पुढे चाला. कामाच्या ठिकाणी इतरांशी नीट वागा. कुटुंबाला वेळ नक्की द्या.

**मिथुन :** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचं चिंतन आणि मनन करण्याचा आहे. हव्या तशा गतीने गोष्टी पुढे सरकणार नाहीत. एखाद्या गूढ आणि संभ्रम निर्माण करण्याऱ्या प्रसंगाला सामोरे जाऊ शकता. पण हे तुमच्या चांगल्यासाठीच असणार आहे. नेहमी वेग हाच पुढे वाढण्याचा प्रमाण नसतो, हे लक्षात ठेवा! या आठवड्यात तुम्हाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे. कोणत्याही प्रसंगी इतरांकडे धाव घेण्यापेक्षा स्वत: अंतर्मुख होऊन उत्तर शोधण्याचा प्रयतक करा. संथपणे आणि शांतपणे काम करा. विवेक आणि संयम ठेवा.

**कर्क :** हा सप्ताह तुमच्यासाठी एक नवीन सुरुवात घेऊन येत आहे. कामामध्ये संथ पण आश्वासक अशी वाटचाल होईल. आर्थिक दृष्ट्या हा काळ तुमच्यासाठी सकारात्मक आहे. समाधानकारक उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. कुटुंबात, आरोग्यात, कामात स्थैर्य लाभेल. या आठवड्यात तुम्ही काहीतरी नवीन शिकण्यासाठी तयार रहा. येणाऱ्या संधीचे सोने करुन घ्या. मुंगी होऊन साखर खाऊन घ्या. आर्थिक गुंतवणूक विश्वासार्ह ठिकाणी करु शकता. लहान गोष्टींमध्ये आनंद माना. आकाशात उडायचे असेल तर आधी पाय जमिनीवर ठेवावे लागतात हे विसरु नका.

**सिंह :** हा सप्ताह तुमच्यासाठी काहीतरी नवीन करून दाखवण्याचा आहे. नवीन काम मिळू शकतं.




कामात बदल घेऊ शकतात. आत्तापर्यंत ज्याची वाट पाहत होता, ती घटना घडू शकते, किंवा त्या घटनेसंदर्भात चांगली बातमी मिळू शकते. केलेली मेहनत फलित होईल. तुम्हाला आतून ऊर्जा मिळेल, जिद्द राहील, उत्साही वाटेल. सकारात्मक वाटचाल होईल. या आठवड्यात तुम्ही एखादा प्रयोग, एखादं नवखं काम हाती घेऊ शकता. तुमची कला, क्रीडा, छंद लोकांसमोर सादर करा. विनम्रपणे, पाय जमिनीवर ठेवून इतरांसमोर व्यक्त व्हा.

**कन्या :** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. तुमचा संयम, तुमचा सात्विक भाव आणि तुमची सचोटी या गोष्टींना धक्का लागण्याचे प्रसंग येऊ शकतात. कामे रखडली जातील. काही प्रमाणात हतबल झाल्यासारखं वाटू शकतं. या आठवड्यात तुम्ही स्वत:ला कणखर बनवण्याची गरज आहे. कुठल्याही आमिषाला भुलू नका. लाचारी पत्करू नका. सात्विक मनाला योग्य वाटत नसेल ते काम अजिबात करू नका. कोणतेही नियम मोडू नका. जोखीम उचलू नका. व्यसनात गुंतू नका. अती तिथे माती हे लक्षात ठेवा! आत्मसंयम ठेवा!

**तूळ :** हा सप्ताह तुमच्यासाठी तुमच्या हिंमतीचा कस लावणारा असणार आहे. जे काही करत आहात त्यात तुमच्या धडाडीची आणि स्वबळाची परीक्षा होऊ शकते. शेवटच्या टप्प्याजवळ काहीतरी अडथळा येऊ शकतो. थोडा विरोध होऊ शकतो. पण त्यावर मात करण्याची तुमच्याकडे ताकत असेल. म्हणून खचू नका, प्रयतकांती परमेश्वर ही उक्ती लक्षात ठेवा! या आठवड्यात जिद्दीने आणि चिकाटीने पुढे चाला. कुठल्याही जुन्या वाईट अनुभवामुळे स्वत:चे खच्चीकरण करू नका. शरीर स्वास्थ्याकडे नीट लक्ष द्या. आलेल्या प्रसंगाला सामोरे जाण्यासाठी सक्षम आहात हा विश्वास ठेवा.

**वृश्चिक :** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन आनंद घेऊन येत आहे. तुम्ही जे करत आहात, त्यामध्ये एक पाऊल पुढे टाकणार आहात. अडकलेले काम सुटेल. मोकळेपणाने तुमच्या भावना व्यक्त केल्या तर चांगला मार्ग निघेल. समस्या पूर्ण नाही सुटली तरी ती कशी सोडवता येईल याचा अंदाज येईल. एकूण परिस्थिती सुधारेल. तब्येत चांगली होईल. ताजे टवटवीत वाटेल! इतरांना समजून घेण्याचा प्रयतक करा. तुमच्या आवडीच्या विषयात नवीन सुरुवात करा. कृतज्ञता बाळगा. एखाद्या कलेत वेळ घालवा. सकारात्मक दृष्टिकोन ठेवलात तर संधीचे सोने होईल!

**धनू :** हा सप्ताह तुमच्यासाठी मध्यांतराचा आहे. खूप कष्ट करुन, बरेच अडथळे ओलांडून तुम्ही एका टप्प्यावर येऊन पोचल्याने आता तुम्हला थोडा वेळ तरी आरामाची गरज वाटणार आहे. कामे संथपणे होतील. अपेक्षित उत्तरं, अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही. एका जागी थांबून रहाल. पण चुकीचे वळण घेण्यापेक्षा आहे तिथे थांबणे योग्य असते! या आठवड्यात तुम्हाला काही प्रमाणात विश्रांती घेण्याची गरज आहे. धावाधाव थांबवा. जमेल तेवढंच काम करा, दडपण घेऊ नका. अतिविचार टाळा. प्रकृतीकडे लक्ष द्या. ध्यान मेडिटेशनचा तुम्हाला चांगला फायदा होईल!

**मकर :** हा सप्ताह तुमच्यासाठी एक पाऊल पुढे टाकण्याचा आहे. तुम्ही एका महत्त्वाच्या टप्प्यावर पोचणार आहात. मागे केलेल्या नियोजनाला आणि कष्टाला चांगले यश मिळेल. पण मार्गावर पुढे जाण्यासाठी कुठल्यातरी गोष्टीची वाट बघावी लागेल. लोकांचं सहकार्य मिळेल. यात्रा किंवा प्रवास संभवतात. नोकरी व्यवसायात अपेक्षित घटना घडायला वेळ लागेल. या आठवड्यात तुम्हाला धैर्य आणि संयम ठेवण्याची गरज आहे. आहात त्या मार्गावर पुढे जाताना, विचारमंथन करा, इतरांचे मत जाणून घ्या. कामाचा विस्तार कसा करता येईल हा विचार करा.

**कुंभ :** हा सप्ताह तुमच्यासाठी कष्ट करण्याचा आहे. कुठलीतरी आवडीची घटना घडायला किंवा केलेल्या प्रयतकांना यश मिळायला वेळ लागेल. वाट पहावी लागेल. संयम आणि धैर्याचा कस लागेल. काहीतरी कमतरता जाणवेल. थांबून रहावं लागेल, इतरांवर अवलंबून राहावं लागेल. या आठवड्यात तुम्ही शांतपणे परिस्थितीचा सामना करण्याची गरज आहे. तडकाफडकी कोणतेही निर्णय घेऊ नका. खूप कष्ट करा. फळ मिळेल हे निश्चित पण विलंब होईल. आर्थिक गुंतवणूक खात्रीशीर ठिकाणी करू शकता. प्रयत्नांती परमेश्वर हे लक्षात ठेवा!

**मीन :** हा सप्ताह तुमच्यासाठी मागे केलेल्या कामाचे चांगले फळ घेऊन येत आहे. कष्टाचं चीज होईल. लोकांकडून तुमचं कौतुक होण्याची शक्यता आहे. तुम्हाला हवं असलेलं नाव, हुद्दा, मान सन्मान, बक्षिस हे या सप्ताहात मिळू शकतात. एखादं अडकलेलं काम मार्गी लागेल. या आठवड्यात तुम्हाला तुमचे पाय जमिनीवर ठेवण्याची गरज आहे. लोकांनी मान दिला, मोठं केलं तर त्यांना खाली पाडू नका. त्यांना एकत्र घेऊन पुढे चाला. आदर्श नेतृत्व करा. अरेरावी करू नका. काही लोक तुमचा दुस्वास करू शकतात, पण तुम्ही त्यांची निंदा करु नका, त्यांना हिणवू नका!

## पान १ वरुन

### छ.शिवाजी महाराज राज्याभिषेक दिन

भानुदास बगदे, विनोद जगताप, राजेंद्र काळे, निंबा मराठे, संजय शेंडे, पत्रकार सुनील पाटील,उल्हास यादव, मनोज ढवळे, विकास बाबर, अतुल सोनवणे, किशोर वाघ, श्रीराम जाधव, सुनिल वरपे, भैया शिंदे, पप्पू माने, दिपक रौधळ, अशोक बाबर, सुनिल ठाणगे, श्याम निरगुडे, उल्हास पाटील, राकेश भोसले, बापू कदम, संभा पाटील, विकी पाटील, गजानन हरणे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवरायांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन ६ जून २०२६ रोजी श्रीराम पेट्रोल पंप समोरील शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास ज्येष्ठ मार्गदर्शक सुनील देवरे यांच्या हस्ते पंच अमृताने अभिषेक करून साजरी करण्यात आला यावेळी छावा संघटनेचे जिल्हा प्रमुख नानासाहेब कदम, छावा चे संघटक राजेश पवार, राजू इंगळे, डॉ पराग ठाकरे, गोकुळ साळुंखे, शरद बिरारी, दिलीप पाटील, ॲड. पी.पी. तवर तसेच शिवप्रेमी व शंभू प्रेमी उपस्थित होते.

### जापीत जमिनीच्या वादातून मारहाण

तक्रारीवरून नंदकिशोर मोतीलाल गुजर, विजय नंदकिशोर गुजर, गंगा नंदकिशोर गुजर (सर्व रा. जापी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. दुसऱ्या बाजूने नंदकिशोर मोतीलाल गुजर (वय ५३) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार शेती जमीन मोजणीच्या कारणावरून झालेल्या वादातून अंकुश जगन्नाथ कोळी, लक्ष्मी नारायण कोळी, छायाबाई अंकुश कोळी, रवींद्र जगन्नाथ कोळी (सर्व रा. जापी) यांनी मारहाण करून दुखापत केली. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. हवालदार रविंद्र माळी तपास करीत आहेत.

### पावसाची चाहूल पण उकाड्याने त्रासात वाढ

वर्दळ दिसत असली तरी पावसाने अद्याप समाधानकारक हजेरी लावलेली नाही. परिणामी जमिनीवरील उष्णता आणि हवेत असलेला ओलावा यांचा एकत्रित परिणाम म्हणून उकाड्याची तीव्रता वाढली आहे. यामुळे शरीरातून मोठ्या प्रमाणात घाम निघत असून नागरिकांना थकवा, चिडचिड आणि अस्वस्थता जाणवत आहे.विशेषतः बाजारपेठा, बसस्थानके आणि गर्दीच्या ठिकाणी नागरिकांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. दुचाकीस्वार, रिक्षाचालक, बांधकाम कामगार आणि रस्त्यावर काम करणाऱ्या मजुरांना उन्हाबरोबरच दमट वातावरणाचाही फटका बसत आहे. अनेकजण थंड पेये, सरबत, लिंबूपाणी आणि नारळपाण्याचा आधार घेताना दिसत आहेत.

घरांमध्येही उकाड्याचा परिणाम जाणवत आहे. रात्री उशिरापर्यंत घाम येत असल्याने झोपेचा खोळंबा होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना विशेष काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. डॉक्टरांनी पुरेसे पाणी पिणे, हलका आहार घेणे आणि अनावश्यकपणे उन्हात जाणे टाळण्याचा सल्ला दिला आहे.

दरम्यान, हवामानातील या बदलामुळे शेतकऱ्यांमध्येही उत्सुकता वाढली आहे. पावसाचे आगमन कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले असून खरीप हंगामाच्या तयारीला वेग आला आहे. वातावरणातील वाढलेली आर्द्रता ही मान्सूनच्या आगमनाची नांदी मानली जात असली तरी नागरिकांना आता दिलासा देणाऱ्या जोरदार पावसाची प्रतीक्षा आहे.एकीकडे पावसाची चाहूल आणि दुसरीकडे वाढता उकाडा अशा दुहेरी परिस्थितीत सध्या सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत. त्यामुळे आता तरी पाऊस बरसावा आणि उकाड्यातून सुटका व्हावी अशीच भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

### नीट परीक्षा प्रकरणी शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा

हे एक राजकीय संवाद रणनीतीकार आहेत. त्यांनी आपले पदवीचे शिक्षण पुण्यातून पत्रकारितेत पूर्ण केले असून, सध्या ते अमेरिकेतील बॉस्टन युनिव्हर्सिटीमधून पब्लिक रिलेशन्समध्ये मास्टर्स करत आहेत. यापूर्वी २०२० ते २०२३ या काळात त्यांनी आम आदमी पार्टीच्या सोशल मीडिया टीमसोबत काम केले होते. विशेषतः २०२० च्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपच्या डिजिटल आणि मीम-बेस्ड प्रचाराची धुरा सांभाळण्यात त्यांची मोठी भूमिका होती. १५ मे २०२३ रोजी भारताच्या सरन्यायाधीशांनी केलेल्या एका वक्तव्याचा निषेध म्हणून त्यांनी १६ मे रोजी सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टीची स्थापना केली होती, जी आज एका मोठ्या जनआंदोलनाच्या रूपाने रस्त्यावर उतरली आहे.

#### सोनम वांगचुक हातात गुलाबाचे फूल घेऊन आंदोलनात दाखल

नीट पेपर लीक आणि देशातील नामांकित परीक्षांमधील घोटाळ्यांविरोधात दिल्लीच्या जंतर-मंतर मैदानावर सुरू असलेल्या कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाला आता प्रचंड मोठे राष्ट्रीय स्वरूप आले आहे. लडाखचे प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक हे हातात लाल गुलाबाचे फूल घेऊन आंदोलनात अधिकृतपणे सहभागी झाले आहेत. त्यांच्या आगमनामुळे आंदोलक विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

अमेरिकेच्या बॉस्टनमधून शनिवारी सकाळी दिल्ली विमानतळावर दाखल झालेले सीजेपी संस्थापक अभिजित दीपके हे विमानतळावरील दीड तासांच्या हायव्होल्टेज ड्राम्यानंतर कडक सुरक्षा व्यवस्थेत थेट जंतर-मंतर मैदानावर पोहोचले. दीपके मैदानावर पोहोचताच हजारो विद्यार्थ्यांनी जय भीम आणि धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडला.

#### तुकड़े-तुकड़े गँग म्हणत आंदोलनात घुसण्याचा प्रयत्न

दरम्यान, दुपारी आंदोलनादरम्यान हातात कॉकरोच मारणारा हिट स्प्रे घेऊन घुसलेल्या व्यक्तीबाबत आणखी एक मोठी माहिती सफेर आली आहे. या व्यक्तीने जंतर-मंतरवर घुसून कॉकरोच जनता पार्टी ही तुकडे-तुकडे गँगचा विस्तार असल्याचा आरोप करत गोंधळ घालण्याचा प्रयत्नकेला. यावरून उखढ चे सर्फ्थक आणि त्या व्यक्तीमध्ये जोरदार धक्काबुक्की आणि बाचाबाची झाली. मात्र, परिसरात तैनात असलेल्या कडक पोलीस बंदोबस्ताने तात्काळ हस्तक्षेप करत त्या संशयास्पद व्यक्तीला ताब्यात घेऊन मैदानातून बाहेर काढले.

### पंजाबमध्ये अपघात नऊ ठार, पंधरा जखमी

माहिती मिळताच पोलीस आणि बचाव पथकं तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. मृतदेह शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले आहेत. एकाच कुटुंबातील अनेक सदस्यांच्या मृत्यूमुळं संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. फिरोजपूर-फाजिल्का राष्ट्रीय महामार्गावरील या भीषण अपघातानं एका सुखी कुटुंबाचा आनंद क्षणभर हिरावून घेतला. कुटुंबीयांनी सांगितलं की, ते पहाटे चार वाजता घरातून निघाले होते आणि डेरा बियासकडे जात होते. एका धार्मिक यात्रेचा इतका दुःखद अंत होईल, याची कोणी कल्पनाही केली नव्हती.

### हुडको कॉलनीच्या खुल्या जागेची मागणी

हुडको कॉलॉनीचे बाळा शिंदे, बी.आर. गोसावी, योगेश मिस्त्री, रतीलाल निकुंभ, दिलीप पाटील, योगेश चौधरी, राजेश्वर तवर, सिद्धार्थ अहिरे, नरेश शिंदे, सुनीता मराठे, अरुणा पाटील, गीता गोहेल, मेघा पाटील, निर्मला शिंदे, पायल भोई, मनीषा सुळ आदी उपस्थित होते.

### एल.पी.जी. सिलिंडर घरपोच द्या; मागणी

प्रतीक्षा करत बसावे लागत आहे. घरपोच गॅस सिलिंडरचे पैसे घेऊन नागरिकांना कोराई येथे सिलिंडर देण्यात येत असून गॅस एजन्सीधारक घरपोच गॅस सिलिंडर देण्यात असमर्थता दर्शवीत आहे. यासाठी भारतीय जनता पक्षाच्यावतीने अक्कलकुवा तहसीलदार यांच्याकडे या समस्याचे निवारण करण्यासाठी निवेदन देण्यात आले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष तथा उपसरपंच विनोद कामे, सरपंच किरण पाडवी, ग्राम पंचायत सदस्य देविदास वसावे, सुनिल सोनवणे, आलमगीर बलोच, संजय पाडवी आदी. सदस्य उपस्थित होते.

## पं.दीनदयाल उपाध्याय जि.प्रशिक्षण महाअभियान-कार्यशाळेचा समारोप
## पालकमंत्री ना.रावलांसह आ.अमरिशभाई पटेल यांची प्रमुख उपस्थिती

**शिरपूर, दि.६- शिरपूर तालुक्यातील तांडे येथील मुकेशभाई आर. पटेल मिलिटरी स्कूलच्या सभागृहात भारतीय जनता पार्टी तर्फे पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण महाअभियान- कार्यशाळेचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात शनिवारी पालकमंत्री ना. जयकुमार रावल, आमदार अमरिशभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.**



समारोप सोहळ्या प्रसंगी पालकमंत्री ना. जयकुमार रावल, माजी मंत्री आ. अमरिशभाई पटेल, भाजपा धुळे जिल्हा प्रभारी रवि अनासपुरे, आमदार काशिराम पावरा, माजी खा. सुभाष भामरे, आमदार राम भदाणे, लोकनियुक्त नगराध्यक्ष चिंतन पटेल, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपा जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे, नंदुरबार जिल्हा प्रभारी बबनराव चौधरी, माजी जिल्हाध्यक्ष नारायण पाटील, माजी जि.प.अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, शिरपूर विधानसभा प्रभारी के.डी. पाटील, अनेक मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री ना. जयकुमार रावल यांनी शनिवारी ३० मे २०२६ रोजी समारोप सत्रात मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, भाजपा जगातील १४ कोटी सदस्य असलेली सर्वात मोठी पार्टी आहे. पक्षाच्या पारिवारिक नाते निर्माण होण्यासाठी शिरपूर येथे भाजपातर्फे दोन दिवसीय निवासी शिबीर घेण्यात येऊन अकरा विविध सत्रे घेण्यात आले. भारतीय जनता पार्टी व देशाचा इतिहास या विषयावर मनोगत व्यक्त करतांना त्यांनी अनेक दाखले देत गौरवशाली भारताबद्दल माहिती दिली. देशाचा गौरवशाली इतिहास, रामायण, महाभारत, हजार वर्षाचा इतिहास, स्वातंत्र्य, स्वतंत्रतेचा लढा, देशभक्त, स्वातंत्र्य सैनिक यांचे योगदान, अशा विविध मुद्द्यांवर अतिशय अभ्यासपूर्ण विवेचन केले. तसेच भाजपाच्या प्रत्येक कार्यालय सहभागी होण्या सह नेहमी योगदान देण्याचे भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते यांना आवाहन केले.

माजी खा. सुभाष भामरे यांनी महत्वपूर्ण सत्रात मनोगत व्यक्त करतांना, पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या कार्याबद्दल विवेचन करुन त्यांनी घेतलेल्या देशाच्या रक्षणासाठी अनेक हिताचे निर्णय स्पष्ट केले. पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण महाअभियान-२०२६ अंतर्गत दोन दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन माजी शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांच्या हस्ते २९ मे २०२६ रोजी मुकेशभाई पटेल मिलिटरी स्कूलच्या स्व. नानासाहेब उत्तमराव पाटील सभागृहात करण्यात आले. तसेच समारोप ३० मे रोजी पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.

कार्यशाळेच्या शुभारंभ प्रसंगी माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल यांनी देशासमोरील राजकीय, सामाजिक आव्हाने व आजची परिस्थिती या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. पंतप्रधान नरेंद्र मोदीव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व्हिजनरी नेतृत्वाबद्दल गौरव करत महाराष्ट्र व देशाची प्रगती होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला. त्यांनी देशातील बदलती राजकीय परिस्थिती, सामाजिक परिवर्तन, जनतेच्या अपेक्षा तसेच कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर भाष्य केले. भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता हा केवळ राजकीय कार्यकर्ता नसून समाजाशी बांधिलकी जपणारा घटक असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी तळागाळात सक्रिय राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

भाजपा धुळे जिल्हा प्रभारी रवि अनासपुरे यांनी वैचारिक अधिष्ठान या विषयावर मार्गदर्शन केले. भारतीय जनता पक्षाची विचारधारा, राष्ट्रहिताची भूमिका, संघटनात्मक मूल्ये आणि कार्यकर्त्यांचे वैचारिक बळ यावर त्यांनी सविस्तर भाष्य केले. पक्षाच्या विचारसरणीचा प्रसार प्रभावीपणे करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सतत अध्ययनशील राहण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

आ.काशिराम पावरा यांनी विचार परिवार या विषयावर मार्गदर्शन करत संघटनात्मक समन्वय, सामाजिक बांधिलकी आणि कार्यकर्त्यांमधील सुसंवादाचे महत्त्व अधोरेखित केले. पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता हा समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी संवेदनशील असावा आणि जनतेमध्ये विश्वास निर्माण करावा, असे त्यांनी सांगितले.


धुळे जिल्हाध्यक्ष रामकृष्ण खलाणे यांनी कार्यशाळेच्या उद्देशाविषयी माहिती देत कार्यकर्त्यांनी प्रशिक्षणातून मिळणारे मार्गदर्शन प्रत्यक्ष कामात उतरविण्याचे आवाहन केले. तसेच दोन दिवस चाललेल्या प्रशिक्षण कार्यशाळेबद्दल व सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या बद्दल कौतुक करत प्रशिक्षणाची सोयी सुविधा उत्कृष्ट केल्याबद्दल आभार मानले. सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस भाऊसाहेब देसले यांनी केले. या दोन दिवसीय निवासी कार्यशाळेला धुळे जिल्ह्यातील नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, भाजपाचे पदाधिकारी, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, शिरपूर शहर व तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निधन वार्ता
#### मंगला कुलकर्णी



धुळे दि.६ - धुळ्याच्या संगीत क्षेत्रातील सुपरिचित व्यक्तीमत्व, स्वरसाधनेतून असंख्य विद्यार्थी घडविणाऱ्या नादब्रह्म संगीत विद्यालयाच्या संचालिका व संगीताचार्य डॉ बाळासाहेब नाईक यांच्या शिष्या तसेच जेष्ठ गायिका मंगलाताई प्रभाकर कुलकर्णी वार्धक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे देहदान जिल्हा शासकीय रुग्णालयात करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी व सून, जावई असा परिवार आहे. सरस्वती कॉलनीतील सुपरिचित व्यावसायिक अनिरुद्ध कुलकर्णी यांच्या त्या मातोश्री होत.

### निधन वार्ता
#### शामराव शिंदे



साक्री, दि.६ - साक्री तालुक्यातील प्रतापपूर येथील मूळ रहिवासी तथा नागरे नगर, साक्री येथील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक शामराव भटू शिंदे यांचे निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते. ते पत्रकार तथा मुख्याध्यापक जगदीश शिंदे यांचे वडील, माजी नगरसेविका तथा महिला आघाडी अध्यक्ष ॲड. पूनम शिंदे-काकुस्ते यांचे सासरे तर प्राथ. शिक्षक दादाजी पाटील व राजेंद्र देवरे यांचे सासरे होत.


**पाहिजेत**
MIDC येथे Accountant सुपरवाईजर होतकरू कामगार पाहिजेत.
9130397130

**पाहिजेत**
सिलेंडर वाटप कामासाठी हुषार, होतकरु मुलगा/माणूस पाहिजेत. (ॲपेरिक्षा येणे आवश्यक)
तिरुपती गॅस एजन्सी
गल्ली नं.२, पुर्ती बिल्डींग जवळ, धुळे
8554982900
7875556589


### पत्रकार बांधव

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ(आपला महाराष्ट्र) धुळे सभासद नोंदणी सुरु असून दि.६ जुन ते १३ जुन २०२६ पर्यंत संघाचे सदस्याचे फार्म भरुन देणे आहे. त्यासाठी फार्म फी.१० रु व सदस्य फी रु.५० असे एकुण साठ रु भरावयाचे आहेत. तरी सर्व सदस्यांनी मुदतीत फार्म भरुन सहकार्य करावे. कळावे

वेळ - सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत

डी.बी.पाटील, सरचिटणीस — यशवंत हरणे, अध्यक्ष
धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघ


**भाड्याने देणे आहे**
डी-मार्ट जवळ वरच्या मजल्यावरील २ रुम, मोठी गॅलरी, शाकाहारी व निर्व्यसनी लहान कुटुंबाला सर्व सोयीयुक्त भाड्याने देणे आहे.
9422736263

**पाहिजेत**
दुकान कामासाठी पार्ट टाईम फुलटाईम मुले - २ मुली - २ पाहिजे.
- समक्ष भेटा -
महावीर ड्रेसेस
फुलवाला चौक, धुळे

**पाहिजेत**
Thancos Natural Icecream
Part Time/ Full Time
कॅफे, आईस्क्रीम पार्लरमध्ये कामाचा अनुभव आवश्यक
बेसिक कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक
पत्ता : जयहिंद कॉलेज रोड, देवपूर, धुळे
इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा : 9270492404

जी.के. आर्केड या रिअल इस्टेट प्रोजेक्टसाठी
**सेल्स प्रतिनिधी पाहिजेत**
GK ARCADE Shops & Luxurious Flats
नकाणे रोडवरील फ्लॅट, शॉप्स व बोरकुंड व आर्वी येथील प्लॉटींग ले-आऊट च्या विक्रीसाठी आम्हाला कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी सेल्स प्रतिनिधींची गरज आहे.
प्रॉपर्टी ब्रोकर्स आमंत्रित
आकर्षक कमिशन मिळवण्याची सुवर्णसंधी! रिअल इस्टेट क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी...
पात्रता: कोणत्याही शाखेचा पदवीधर, ग्राहकांशी उत्तम संवाद साधण्याची कला अवगत असावी. रिअल इस्टेट किंवा कोणत्याही मार्केटिंग क्षेत्रातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य, स्वतःची दुचाकी असणे आवश्यक.
आजच संपर्क साधा! जी.के.आर्केड संपर्क : 88881 92677, 94227 92677

**पाहिजे**
धुळेच्या सुप्रसिध्द बेकरी मध्ये Marketing and Sales साठी माणूस पाहिजे. लिहिता आणि वाचता येणे आवश्यक.
लाईफ लाईन बेकरी
मालेगा रोड, धुळे.
8999961619

**प्लॉट विकणे आहे**
धुळे नगावबारी हॉटेल साई किशनमागे हिंगलाज माता मंदिरजवळ, २९७/२ मधील उत्तर मुखी प्लॉट नं. ३३/३६/३७ विकणे आहे.
: संपर्क :
प्रशांत भावसार फेटेवाले
9422287548

**पाहिजेत**
माल वाटपासाठी अनुभवी डिलीव्हरी बॉय आणि ड्रायव्हर पाहिजेत.
- समक्ष भेटा -
कंचन डिस्ट्रीब्युटर्स
सराफ बाजार, रामदेव बाबा मंदीर जवळ, धुळे

**पाहिजे**
१) फार्मासिस्ट
२) कॉम्प्युटर ऑपरेटर
अनुभव आवश्यक
8208879381
9423495381

**घर विकणे आहे**
दोन हजार स्क्वेअर फुट प्लॉट वरील आठ खोल्यांचे एक मजली घर विकणे आहे. घराच्या आवारात पेरू आंबा जास्वंद अंजीर आवळा यांची झाडे आहेत.
पत्ता- नवजीवन नगर फाशी पूलाजवळ,
9529997352
9881255577

**पाहिजेत**
भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (BPCL)
पंपावर डिझेल/पेट्रोल/गॅस भरण्यासाठी अनुभवी मुले पाहिजेत
पगार : १० - १५ हजार + बोनस+विमा
: समक्ष भेटा :
9225640005

**विकणे आहे**
2 BHK फ्लॅट व दुकान १ महिन्यात ताबा
१) इंद्रा आर्केड, प्लॉट नं. ६०, जयहिंद कॉलेज रोड, जयहिंद कॉलनी देवपूर, धुळे
२) उषा हाईट्स, प्लॉट नं. १०३, जयहिंद कॉलनी सोना सुपर शॉप समोर, धुळे
-: संपर्क :-
8698955000

**तार कंपाऊंड**
तार कंपाऊंड तयार करुन मिळेल.
शांती सिमेंट प्रॉडक्टस, एमआयडीसी, धुळे
- संपर्क -
9422289550

**पाहिजेत**
मेहेरगांव -शिरडाणे येथे शेतात राहण्यासाठी फॅमिली पाहिजे.
सर्व सोयींसह
: संपर्क :
9422287548

**पाहिजेत**
रेडिमेड दुकान कामासाठी हुशार मुले पाहिजेत.
आकर्षक पगार.
- त्वरीत भेटा -
श्री सत्यनारायण ड्रेसेस, ग.नं.२, जैन मंदीराजवळ, धुळे
Ph - 236485

**पाहिजेत**
होलसेल मेडीकल दुकानासाठी कॉम्प्युटर ऑपरेटर
लेडिज जागा-२
: समक्ष भेटा :
श्रीसाई फार्मा
गल्ली नं.५, बँक ऑफ इंडिया समोर, धुळे
9270144871
9270144871

**पाहिजेत**
हॅण्डलुम दुकानात कामासाठी लेडीज/जेण्टस सेल्समन पाहिजेत, तसेच लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर लावणे आहे. समक्ष भेटा.
अजिंक्य हॅण्डलुम
ग. नं. ८ जिनगर गल्ली, धुळे



2026 New Model + Upto 30% डिस्काउंट + फ्री वाढीव वॉरंटी + १०% पर्यंत इन्स्टंट डिस्काउंट क्रेडिट कार्डवर*
0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.*
आता मिळवा लेटेस्ट AC तेही 0% फायनान्स वर
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

**बंगला भाड्याने देणे आहे**
देवपूर, दत्तमंदीर चौकापासून जवळ गोंदूर रस्त्यालगत असलेला, सत्संग कॉलनीमधील प्लॉट नं.६१ मधील लिव्हींग रुम, कीचन, तीन बेडरुम, दोन टॉयलेट क्लोजड्, कार पार्किंग, कॉर्पोरेशनचे व विहीरीचे पाणी असलेला बंगला शासकीय कर्मचारी, बँक, एलआयसी कर्मचारी यांना भाड्याने देणे आहे.
संपर्क :- 9421531431

**पाहिजेत**
• नर्स (ANM GNM)
• R.M.O
• रिसेप्शनिस्ट
• B.Sc.ऑप्टोमेट्रीस्ट
संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**पाहिजेत**
M.I.D.C.मध्ये गोडावून व ऑफिस कामासाठी मुलगा पाहिजेत. कॉम्प्युटर येणे आवश्यक
: संपर्क :
9511706150

**फ्लॅट विकणे**
प्रशस्त 2 BHK चे फ्लॅट सर्व सोयीयुक्त २४ तास पाणी, प्रशस्त पार्कींग, शाळा, मार्केट, हॉस्पिटल पासून अगदी जवळ, वाडीभोकर रोड पासून २ मिनीट अंतरावर असे उत्कृष्ट लोकेशन, बँकेतून होम लोन उपलब्ध.
: संपर्क : 9623099997


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०